। धाराशिव । वर्ष २६ वे । अंक १६ वा । बुधवार दिनांक १८ मार्च, २०२६ । पृष्ठ ६ । किंमत ०१ ₹
RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26
dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## सायबर गुन्ह्यांपासून संरक्षणासाठी सजगता हवी –प्रल्हाद सुर्यवंशी



उमरगा (प्रतिनिधी)- दिवसेंदिवस सायबर क्राईमच्या घटना वाढत आहेत, त्या टाळण्यासाठी सजगता आवश्यक असल्याचे प्रतिपादन पोलिस निरीक्षक प्रल्हाद सुर्यवंशी यांनी केले. शहरातील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात समाजशास्त्र विभागाच्या वतीने शुक्रवारी, (दि १३) सायबर क्राईम याविषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.डिजिटल ई-पेपर

पोलीस निरीक्षक प्रल्हाद सुर्यवंशी यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ संजय अस्वले होते. यावेळी उपप्राचार्य डॉ विलास इंगळे, डॉ पद्माकर पिटले, समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ प्रदीप पाटील, डॉ ज्ञानोबा पडोळे उपस्थित होते. कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात पोलीस निरीक्षक सुर्यवंशी सायबर क्राईम विषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की, इंटरनेट, संगणक, मोबाईल किंवा डिजिटल उपकरणाचा बेकायदेशीर वापर म्हणजे सायबर क्राईम आहे.

सध्याच्या डिजिटल युगात ऑनलाईन व्यवहार वाढले आहेत. मात्र अनेकजण याविषयी अज्ञान आहेत. डिजिटल युगात सायबर क्राईमची प्रकरणे झपाट्याने वाढत आहेत. मोबाईल, इंटरनेट आणि सोशल मीडियाचा वापर करताना विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. अन ोळखी व्यक्तींना ओटीपी, बँक खाते क्रमांक, एटीएम पिन किंवा वैयक्तिक माहिती देऊ नये. संशयास्पद लिंक, मेसेज किंवा कॉलवर विश्वास ठेवू नये.

सोशल मीडियावर अनोळखी फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकारताना सावध राहावे. मजबूत पासवर्ड वापरून वेळोवेळी बदलणेही महत्त्वाचे आहे. आर्थिक फसवणूक किंवा ऑनलाइन छळ झाल्यास त्वरित पोलीसांकडे तक्रार करावी.

सजगता आणि सतर्कता हीच सायबर गुन्ह्यांपासून बचावाची सर्वात प्रभावी उपाययोजना असल्याचे सांगून व्हॉट्सअँप इन्स्टाग्राम, फेसबुकच्या माध्यमातून मुलीची कशी फसवणूक केली जाते याची उदाहरणे दिली. दुसऱ्या सत्रात डॉ रेवते आणि डॉ सुरवसे यांनी हॅकिंग, फिशिंग, सायबर बुलिंग आणि मालवेअर हल्ला याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सैफ इनामदार यांनी केले. सुत्रसंचालन कु अनिषा सुरवसे यांनी केले. डॉ सुमेध राजूरकर यांनी आभार केले. कार्यशाळेला प्राध्यापकासह विद्यार्थी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## धाराशिवमध्ये २५ हजार मानधनासाठी आशां'च्या ३ तास घोषणा



धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)-आशा सेविकांना २५ हजार तर गटप्रवर्तकांना ३५ हजार रुपये मानधन देण्यात यावे, या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तक महासंघाच्या वतीने सोमवारी जिल्हा परिषदेसमोर आंदोलन केले. तब्बल तीन तास चाललेल्या आंदोलनात आशासेविकांनी मागणीबाबत घोषणा दिल्या.

ग्रामीण भागातील आरोग्य सेवेचा कणा म्हणून आशासेविका काम करत आहेत. मात्र, त्यांच्या विविध मागण्या शासस्तरावर अनेक वर्षांपासून प्रलंबित आहेत. सोमवारी महाराष्ट्र राज्य आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तक महासंघाच्या वतीने जिल्हा परिषदेसमोर दुपारी १२:३० वाजेच्या सुमारास आंदोलनास प्रारंभ झाला. गटप्रवर्तकांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा देण्यात यावा, मागील तीन महिन्याचे केंद्राकडील थकीत मानधन अदा करण्यात यावे, शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा दिला जात नाही तोपर्यंत आशासेविकांना २५ हजार रुपये मानधन, गटप्रवर्तकांना ३५ हजार रुपये मानधन देण्यात यावे,आदी मागण्या केल्या. आंदोलनात ५० च्या जवळपास गटप्रवर्तकही सहभागी होते. यावेळी जिल्हा संघटक सुरेखा ठाकूर, जिल्हा संघटक नवनाथ धुमाळ आदी पदाधिकारी होते. जिल्ह्यात सुमारे १३०० आशासेविका व ६० गटप्रवर्तक कार्यान्वित आहेत. सोमवारी त्यांनी काम बंद ठेवून आंदोलन केल्याने ग्रामीण भागातील लसीकरण मोहीम, गृहभेटी, माता बैठका, तसेच गरोदर मातांना पुरवण्यात येणाऱ्या आरोग्य सेवेवर परिणाम झाला होता.

## जिल्ह्याला रस्ते आणि पुलांसाठी ६२ कोटी: अर्थसंकल्पात तरतूद आमदार राणाजगजितसिंह पाटील यांची माहिती



धाराशिव (प्रतिनिधी)- धाराशिव जिल्ह्यातील दळणवळण यंत्रणा अधिक बळकट करण्यासाठी आपल्या महायुती सरकारने यंदाच्या अर्थसंकल्पात धाराशिव जिल्ह्यासाठी भरीव तरतूद केली आहे. जिल्ह्यातील विविध राज्यमार्ग आणि प्रमुख जिल्हा मार्गांच्या सुधारणेसह नवीन पुलांच्या बांधकामासाठी तब्बल ६२ कोटी रुपयांच्या कामांना प्रशासकीय मंजुरी देण्यात आली आहे. यामुळे ग्रामीण भागातील रस्ते विकासाला मोठी गती मिळणार असून प्रवाशांचा प्रवास सुखकर होणार आहे. परंडा, कळंब, तुळजापूरसह सर्वच तालुक्यांतील दळणवळण सुसाट होणार असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे. जिल्ह्यातून. जाणाऱ्या राज्य महामार्गांचा कायापालट करण्यासाठी २८ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. जिल्ह्यातील महत्त्वाच्या सहा राज्यमार्गांच्या सुधारणेसाठी २८ कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत. यामध्ये प्रामुख्याने परंडा आणि कळंब तालुक्यातील रस्त्यांचा समावेश आहे. तर परंडा तालुक्यातील महारटाकळी-पाटोदा-भूम-वारदवाडी या राज्यमार्ग क्र. ६२ वरील मोठ्या पुलाचे बांधकाम आणि रस्ता सुधारणेसाठीही मोठा निधी मिळाला आहे.

कळंब तालुक्यात राज्यमार्ग-५२ ते कळंब-लातूर या राज्यमार्ग क्र. २३६ च्या सुमारे १४ किलो मीटर अंतराच्या कामासाठी ३ कोटी ५० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. तर धाराशिव तालुक्यात राज्य मार्ग-२११ ते उपळा-तेर-जागजी या राज्यमार्ग क्र. २३९ च्या सुधारणेचे कामही मार्गी लागणार असल्याचे आमदार पाटील यांनी सांगितले आहे.

धाराशिव जिल्ह्यातील राज्य मार्गांसोबतच जिल्हा मार्गांसाठीही ३४ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून त्यातून विविध जिल्हा मार्गावर पुलांचे जाळे विणले जाणार आहे. प्रमुख जिल्हा मार्गांच्या एकूण ९ कामांसाठी ३४ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. विशेष म्हणजे, या निधीतून अनेक ठिकाणी नवीन पुलांची निर्मिती केली जाणार आहे. तेर-डकवाडी-काजळा या मार्गावरील काजळा गावाजवळ आणि कोळेवाडीजवळ नवीन पुलांचे बांधकाम करण्यात येणार आहे. तुळजापूर-धाराशिवसह तावरजखेडा, बेंबळी, आरणी आणि अणदूर परिसरातील तब्बल ८६ कि.मी. लांबीच्या रस्त्यांच्या दुरुस्तीला वेग मिळणार आहे. भूम तालुक्यात गिरवली-ईट-पाथ्रड-वालवड रस्ता क्र. ९ वरील वालवड येथे नवीन लहान पूल उभारला जाणार असल्याचे आमदार पाटील यांनी म्हटले आहे.

**प्रलंबित असलेले रस्त्यांचे प्रश्न मार्गी लागणार**

अर्थसंकल्पात आपल्या महायुती सरकारने मोठ्या प्रमाणात तरतूद केलेल्या या निधीमुळे धाराशिव जिल्ह्यातील ग्रामीण भागाचे शहरी केंद्रांशी असलेले नाते अधिक घट्ट होणार आहे. रस्त्यांच्या कामांमुळे शेतकऱ्यांच्या मालाची वाहतूक आणि विद्यार्थ्यांचा प्रवासही अधिक सुखकर होणार आहे. या अर्थसंकल्पीय तरतुदीमुळे धाराशिव, परंडा, भूम, कळंब आणि तुळजापूर मतदारसंघातील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले रस्त्यांचे प्रश्न आता मार्गी लागणार असून जिल्ह्यातील जनतेच्या वतीने राज्याचे मुख्यमंत्री देवेंदजी फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे,उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार व सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचे आभार मानत असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी म्हटले आहे.

## क्राईम न्युज

### धाक दाखवुन महिलेस लुटले

परंडा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नामे- प्रमिला भगवान आगरकर, वय ६३ वर्षे, रा. आगरकर गल्ली परंडा ता. परंडा जि. धाराशिव या दि. १६.०३.२०२६ रोजी कृषी विभागाचे हद्दीत क्षेत्र सोनगिरी शिवारातील शेताकडे जात असताना अनोळखी तीन इसमांनी मोटरसायकलवर येवून फिर्यादीचे तोंड दाबुन, दगडाने व चाकुन मारहाण करण्याची धाक दाखवून गळ्यातील सोन्याचे मनी मंगळसुत्र व कानातील फुले असे एकुण आठ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने एकुण १६,००० किंमतीचे बळजबरीने चोरुन घेवून गेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- प्रमिला आगरकर यांनी दि.१६.०३.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन परंडा पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०९(४), ३(५) गुन्हा नोंदवला आहे.

### वीस लिटर गावठी दारु पकडली;गुन्हा दाखल

शिराढोण (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत केशरबाई रा. लोहटा पुर्व ता. कळंब जि. धाराशिव हे दि.१६.०३.२०२६ रोजी आपल्या राहत्या घराचे पाठीमागील बाजूस पारधी पिढी लोहाटा पुर्व येथे अंदाजे १,२०० किंमतीची २० लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये शिराढोण पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

### तुळजापूरातून मोटारसायकलची चोरी

तुळजापूर (प्रतिनिधी)- तुळजापूर पोलीस ठाणे अंतर्गत भैय्यासाहेब रा. पोलीस लाईन धाराशिव ता. जि. धाराशिव यांची अंदाजे ५५,००० एक मोटरसायकल क्र एमएच २५ बीएच १६११ ही दि. १२.०३.२०२६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते तुळजापूर येथुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- भैय्यासाहेब बनसोडे यांनी दि.१६.०३.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) गुन्हा नोंदवला आहे.

### धाराशिवातून दारु जप्त

धाराशिव (प्रतिनिधी)- शहर पोलीस ठाणे अंतर्गत बालाजी रा. इंदापूर ता. बार्शी जि. सोलापूर हे दि.१६.०३.२०२६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक धाराशिव येथे अंदाजे २२,९५० किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या ३३ सिलबंद बाटल्या ॲटो रिक्षासह अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये धाराशिव शहर पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

## गॅस व पेट्रोल-डिझेल टंचाईच्या अफवांवर विश्वास ठेवू नका अनावश्यक गर्दी टाळा-जिल्हाधिकारी यांचे आवाहन

धाराशिव (जिमाका)-केंद्र शासन व संबंधित कंपन्यांकडून राज्यात एलपीजी गॅस तसेच पेट्रोल -डिझेलच्या पुरवठ्यात कोणतीही टंचाई नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. जिल्ह्यातील सर्व गॅस एजन्सी तसेच पेट्रोल पंपांवर इंधनाचा पुरवठा नियमितपणे सुरू असून पुरेसा साठा उपलब्ध आहे.त्यामुळे नागरिकांनी कोणत्याही प्रकारच्या अफवांवर विश्वास ठेवू नये.

नागरिकांनी आवश्यकतेनुसारच गॅस सिलेंडर बुकिंग करावे तसेच पेट्रोल-डिझेल खरेदी करावी.गॅस एजन्सी व पेट्रोल पंपांवर अनावश्यक गर्दी करून साठवणूक करण्याचा प्रयत्न करू नये.गॅस सिलेंडरचे वितरण नियमानुसार व बुकिंगनुसार केले जाईल. त्यामुळे नागरिकांनी संयम बाळगून प्रशासनास सहकार्य करावे.

तसेच पेट्रोल पंपांवर घाईगडबडीत रांगा लावणे किंवा मोठ्या प्रमाणात इंधन साठवून ठेवणे टाळावे.पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी सर्व यंत्रणा कार्यरत असून नागरिकांनी शांतता व शिस्त राखून प्रशासनाला सहकार्य करावे,असे आवाहन जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी केले आहे.

## महाद्वार परिसर अतिक्रमण अन् फेरीवाल्यांच्या विळख्यात

तुळजापूर (प्रतिनिधी)-महाद्वार परिसर अतिक्रमण आणि फेरीवाल्यांचा विळख्यात अडकला असून, भाविकांसह नागरिकांना रस्ता शोधताना कसरत करावी लागत आहे. भाविकांसह कर्मचाऱ्यांवर हल्ला करण्यापर्यंत फेरीवाल्यांची मुजोरी वाढली आहे. भाविकांच्या सुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. दरम्यान अतिक्रमण हटवण्यासाठी मंदिर तसेच पोलिस सहकार्य करत नसल्याचा आरोप नगराध्यक्ष विनोद गंगणे यांनी केल्याने खळबळ माजली आहे.

महाराष्ट्रासह देशभरातील लाखावर भाविक दररोज कुलस्वामिनी तुळजाभवानी मातेचा दर्शनासाठी येत असतात. मात्र मुळातच अरूंद रस्ते, त्यात अतिक्रमण, बेशिस्त पार्किंग यामुळे शहरातील रस्ते हरवून गेले आहेत. महाद्वार परिसर अतिक्रमण आणि फेरीवाल्यांचा विळख्यात अडकला आहे. भाविकांसह नागरिकांना रस्ता शोधताना कसरत करावी लागत आहे. महाद्वार परिसरासह शहरातील अतिक्रमण हटवण्याकडे पालिका प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे. दरम्यान शहरातील अतिक्रमण आणि फेरीवाल्यांवर कठोर कारवाई करण्यासह अतिक्रमण हटवण्यासाठी कायमस्वरुपी उपाययोजना करण्यासह या प्रकरणात जबाबदारी निश्चित करण्याची मागणी नागरिकांतून होत आहे.

नोडल ऑफिसरने लक्ष देणे आवश्यक तुळजाभवानी मंदिर तसेच महाद्वार परिसरातील अतिक्रमण तसेच नो पार्किंग झोनमधील वाहनांवर कारवाई करण्यासाठी तत्कालीन जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंबासे यांनी मंदिर संस्थानच्या व्यवस्थापक तहसीलदार माया माने यांची नोडल ऑफिसर म्हणून नियुक्ती केली आहे. मात्र नोडल ऑफिसर म्हणून तहसीलदार माने यांचे याकडे दुर्लक्ष होत असल्याचे दिसते. महाद्वार परिसरातील परिस्थितीत नियंत्रण आणण्याची गरज आहे.

## आश्रमशाळा कर्मचाऱ्यांचा भविष्य निर्वाह निधी प्रलंबित प्रश्न न सुटल्यास आंदोलनाचा इशारा

धाराशिव (प्रतिनिधी)-जिल्ह्यातील आश्रमशाळा शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे भविष्य निर्वाह निधीचे प्रस्ताव तीन महिन्यांपासून प्रलंबित असल्याने संबंधित रक्कम तातडीने मंजूर करून द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात आश्रमशाळा शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संघटनेचे प्रतिनिधी सतीश शहाजी कुंभार यांनी शासन व प्रशासनाकडे निवेदन दिले आहे.

निवेदनात दुर्गम भागातील वाडी-तांडा व डोंगरदऱ्यांमध्ये कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या हक्काची रक्कम वेळेवर मिळत नसल्याने अडचणी निर्माण होत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. मुलांचे शिक्षण, लग्न, घरबांधणी आदी कारणांसाठी भविष्य निर्वाह निधीची रक्कम आवश्यक असल्याचेही सांगितले आहे.

दरम्यान, हा प्रश्न तातडीने मार्गी लावावा; अन्यथा १६ एप्रिल रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव समोर आंदोलन करण्यात येईल, असा इशारा सतीश कुंभार यांनी दिला आहे.

## डॉ.मारुती लोंढे यांना पीएच.डी मार्गदर्शक म्हणून विद्यापीठाची मान्यता



धाराशिव (प्रतिनिधी)- येथील रामकृष्ण परमहंस महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा.डॉ.मारुती अभिमान लोंढे यांना अर्थशास्त्र विषयातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छ.संभाजीनगर यांच्याकडून पीएच.डी. मार्गदर्शक म्हणून मान्यता मिळाली आहे.

डॉ. मारुती लोंढे यांनी सोलापूर जिल्ह्यातील 'माढा आणि पंढरपूर तालुक्यातील ठिबक सिंचनाच्या विकासाचा तौलनिक अभ्यास ' या महत्त्वपूर्ण विषयावर पीएच.डी.चे संशोधन पूर्ण केले आहे , तर 'जनता सहकारी बँक लिमिटेड, कुर्डूवाडी एक चिकित्सक अभ्यास' या विषयावर एम. फिल चे संशोधन पूर्ण केले आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगरच्या अर्थशास्त्र अभ्यास मंडळावर ते निमंत्रित सदस्य म्हणून कार्यरत आहेत.

याच विद्यापीठाच्या बीए भाग २ अभ्यासक्रमासाठी त्यांचे आर्थिक विकास व नियोजन हे पुस्तक संदर्भ ग्रंथ म्हणून लागू झाले आहे. विद्यापीठाच्या अभ्यासक्रमावर आधारित त्यांनी अनेक क्रमिक पुस्तके व संदर्भ ग्रंथाचे लेखन करून एकूण ३४ ग्रंथ प्रकाशित केले आहेत. त्यांना सेंट्रल युनिव्हर्सिटी ऑफ अमेरिका या विद्यापीठाने डि. लीट ही मानद पदवी देऊन सन्मानित केले आहे.

आतापर्यंत त्यांना अनेक राष्ट्रीय व राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित केले आहे.

आत्तापर्यंत त्यांनी आंतरराष्ट्रीय ,राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय चर्चासत्रामध्ये भाग घेऊन अनेक शोधनिबंधाचे सादरीकरण आणि प्रकाशन केले आहे. विविध विषयांवर वर्तमानपत्रातून प्रभावीपणे त्यांनी लेखन केले आहे. त्यांची वळण ही ग्रामीण अर्थकारण सांगणारी कादंबरी सुप्रसिद्ध आहे.

या निवडीबद्दल श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिवा प्राचार्या सौ.शुभांगी गावडे , मुख्यकार्यकारी अधिकारी श्री कौस्तुभ गावडे,कोल्हापूर विभागप्रमुख डॉ. श्रीराम साळुंखे, मराठवाडा सह विभाग प्रमुख प्राचार्य डॉ. जयसिंगराव देशमुख, माजी सहसचिव डॉ.अशोक करांडे, रामकृष्ण परमहंस महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संदीप देशमुख यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## सत्तर हजाराची मोटरसायकल अज्ञाताने चोरली

धाराशिव (प्रतिनिधी)- ग्रामीण पोलीस ठाणे अंतर्गत शौकत अलाउद्दीन तांबोळी, रा. जुनोनी ता. जि. धाराशिव यांची अंदाजे ७०,००० ची मोटरसायकल फिर्यादीचे घरासमोरुन जुनोनी येथुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी शौकत तांबोळी यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव ग्रामीण पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## महागाई वाढण्याची शक्यता

जगात अमेरिका हा देश अस्थिरता निर्माण करीत असल्याचे दिसून येत आहे. ईस्त्राईलच्या खांद्यावर बंदुक ठेवून इराणवर हल्ले करीत आहे. इराण सुद्धा चिवट देश आहे तो निकाराने लढा देत आहे. कोणत्याही परिस्थितीत माघार घेत नाही हे उघड आहे. इराणकडे खणीज संपत्ती आहे. त्यामुळे पेट्रोल स्वस्त व पिण्याचे पाणी महाग आहे. इराणी लोक हे चिवट आहे. इस्लामिक राष्ट्र असले तरी इतर ईस्लामिक राष्ट्र मानवतेच्यादृष्टिने मदत करीत नाहीत. त्याच प्रमाणे एकटा हा इस्त्राईल म्हणजे अमेरिकेशी मदतीने लढत आहे. इराणाकडे मोठी खणीज संपत्ती आहे हे मान्यख केले पाहिजे. गॅस व पेट्रोल-डिझेलचा खजीना आहे. त्यामुळे तो जगाला खनीज इंधन पुरवित असतो. सध्याला विचार केला तर भारतात युद्धाचा परिणाम दिसून येत आहे. स्वयंपाकाचा गॅस मिळत नसल्याने मोठ्या रांगा व चर्चा होत आहे. अजून पेट्रोल किंवा डिझेलची कमतरता भासली नाही. केवळ गॅस बाबत चिंता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे हॉटिल व्यवसायिकेवर संकट आले आहे. व्यावसायिक गॅस टाकी मिळत नाही म्हणून आपला व्यवसाय बंद ठेवला आहे. हॉटेलमधील पदार्थाच्या किंमती वाढल्या आहेत. त्यामुळे इंधनाचा परिणाम मोठा दिसून येत आहे. नुकतेच राज्य सरकारकडून छगन भुजबळ यांनी परत रॉकेल उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची घोषणा केली. वास्तविक कोणत्या कारणामुळे रॉकेल बंद केले हे कळून आले नव्हते. आता परत रॉकेलची उपलब्धता होणार आहे. त्यामुळे परत स्टोव्ह शोधावा लागणार आहे. घरात असेल तर दुरूस्त करावा लागणार आहे. त्यामुळे पुर्वीचे दिवस येणार आहेत. अनेकांनी परत चुली चालू केल्या आहेत. पुर्वीचे दिवस नशिबी आले आहेत. प्रत्येक वस्तू ही ट्रान्सपोर्टींग होते. एका ठिकाणाहुन दुसऱ्या ठिकाणी वस्तू, माल वाहातुक केली जाते. त्यामुळे इंधन लागते. तेच मिळत नसेल किंवा तुटवडा होत असेल तर आपोआप सर्व वस्तूच्या किंमतती वाढ होते हे उघड आहे. त्यामुळे मार्च महिण्यात महागाईचा चटका जनसामान्यांना बसणार आहे. विचार केला तर घाऊक महागाईने फेब्रुवारीमध्ये ११ महिन्यांचा उच्चांक गाठला आहे. अन्नपदार्थ आणि उत्पादन क्षेत्रातील किंमतीत वाढ झाल्याने घाऊक किंमत निर्देशांकावर आधारित महागाई दर २.१३ टक्क्यांवर पोहोचला, अशी माहिती नुकतीच सरकारी आकडेवारीतून समोर आली. विशेष म्हणजे, अमेरिका-इराण तणावामुळे वाढलेल्या कच्च्या तेलाच्या किंमतींचा परिणाम मार्च महिन्याच्या आकडेवारीवर अधिक तीव्रतेने दिसून येण्याची शक्यता आहे. जानेवारीत घाऊक महागाईचा दर १.८१ टक्के होता, तो २.१३ टक्क्यांवर पोहोचला आहे. वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, उत्पादन, मूलभूत धातू व वस्त्रोद्योगातील किंमती वाढल्याने हा परिणाम दिसून येत आहे. याला अपवाद म्हणजे फेब्रुवारीमध्ये अन्नपदार्थांतील महागाई २.१९ टक्क्यांवर पोहोचली. जानेवारीमध्ये ती १.५५ टक्के होती. भाज्यांच्या किंमतीत काहीशी नरमाई दिसली असली तरी डाळी, बटाटे यांच्या किंमती वाढल्याने अन्नमहागाई वाढली. देशातील बेरोजगारी दर फेब्रुवारी महिन्यात किंचित कमी झाला असून, तो ४.९ टक्क्यांवर आला आहे. जानेवारीमध्ये हा दर ५ टक्के होता. १५ वर्षे व त्यापुढील वयोगटातील लोकांमधील बेरोजगारीत घट झाली आहे. कच्च्या तेलाचे भाव मार्चमध्ये १०० डॉलरच्या पार गेले आहेत. 'इंडिया रेटिंग्स'च्या मते, कच्च्या तेलाच्या या दरवाढीचा थेट परिणाम मार्चच्या घाऊक महागाईवर होईल. हा दर मार्चमध्ये ३.७ टक्क्यांपर्यंत जाण्याचा अंदाज आहे. ईस्त्राईल-इराण दरम्यान जे युद्ध चालू आहे याचा परिणाम निश्चित होणार आहे. या परिणामाला तोंड देण्याची तयारी ठेवली पाहिजे. युद्ध म्हटले की नुकसान अटळ आहे. फायदा नाही हे लक्षात ठेवले पाहिजे. भारतीय नागरिकांनी तसे घाबरून जाण्याची गरज नाही. संकट आले, यात दुमत नाही मात्र संकटावर कशा प्रकारे मात करता येईल याचा विचार केला पाहिजे. गॅसचे संकट तेवढे मोठे नाही. आगामी काळात संकट येवू नये म्हणून आगावू गॅस टाकी घरात ठेवून द्यावी ही मानसिकता वाढली आहे. तसे पाहिले तर युद्ध दिर्घ काळ चालेल असे वाटले नव्हते. जागतिक स्तरावर अमेरिकेला पाठींबा मिळत नसल्याचे दिसून येत आहे. इराण हा देश तग धरून आहे. अमेरिकेला शह देत आहे. असे जरी असले तरी भारतासह इतर देशात या युद्धाचा परिणाम दिसून येत आहे. महागाई वाढणार आहे. याला तोंड द्यावेच लागणार आहे. यदाकदाचित इंधनाच्या दरात वाढ झाली तर मग सर्वच वस्तूंच्या दरात मोठी वाढ होणार आहे. सध्याल पेट्रोल व डिझेलचे दर स्थिर आहेत. हे मोठे नशिब म्हणावे लागेल. यात वाढ झाली तर महागाई वाढण्यात सुरवात होणार आहे. अगोदरच देशात बेरोजगारीची समस्या मोठी आहे. निसर्ग शेतकऱ्यास साथ देत नाही. अशा स्थितीत जीवन जगणे ही एक समस्या निर्माण झाली आहे. मुळात युद्ध कोणलाही परवडत नाही. पाकिस्तानची मगरुरी वाढली आहे. आफ्गाणिस्तानबरोबर मस्ती करीत आहे. त्यामुळे आगामी काळात विचार केला तर युद्ध परवडणारे नाही हे पाकिस्तानने लक्षात ठेवले पाहिजे. युद्धानंतर जी परिस्थिती निर्माण होते याला मोठ्या प्रमाणात तोंड द्यावे लागते. इराणाला पुन्हा उभारी घेण्यात मोठे श्रम घ्यावे लागणार! अनेक ठिकाणे उद्धस्थ झाली आहेत. त्यामुळे सध्याला इंधनाबाबत परिस्थिती निर्माण झाली ती भयाण आहे. इंधनाचे दर वाढले की, आपोआप महागाईतर वाढणार आहे. त्याला तोंड द्यावे लागणार आहे. भारतीयांनी काटसरीचे धोरण स्विकारले पाहिजे. ग्रामीण भागात स्वयंपाकाचा गॅसचा तुटवडा निर्माण झाला तर ओरड होणार नाही मात्र शहरी भागात ओरड निश्चित होवू शकते. रॉकेल याला पर्याय नाही. रॉकेल का बंद केले. वास्तविक तेही चालू ठेवले असते तर गोरगरीब याचा फायदा उचलला असता. रॉकेल गोरगरीबांचे इंधन आहे. स्वयंपाकासाठी याचा उपयोग होत होता. अचानक कोणती कारण किंवा कोणती आडचण होती की ते सरकारने बंद केले. यामुळे नुकसान गोरगरीबांचे झाले. आठशे रूपयाची गॅस टाकी घेणे तसे गोरगरीबांना परवडत नव्हते. त्यामुळे सध्याची जागतिक व देशांतर्गत परिस्थिती पाहिली तर महागाई वाढेल अशी मोठी शंका आहे. याला तोंड देण्यात सज्ज असले पाहिजे.

# वाचनही आता मुलभूत गरज मानावी लागेल :डॉ.नागोराव कुंभार




**औसा/प्रतिनिधी :** अभिजात वाङ्.मयामध्ये शाश्वत मूल्ये असतात,जीवन कसं जगावं,जीवनाचे प्रयोजन काय याची दिशा दर्शविते,ते शाश्वत मूल्यांचा संदेश देतात,म्हणून माणसांने असे साहित्य वाचावे असा सल्ला देवून अन्न,वस्त्र,निवारा,शिक्षण,आरोग्य या मुलभूत गरजामंध्ये आता वाचनाचाही मुलभूत गरजांमध्ये समावेश करावा लागेल,असे मत ज्येष्ठ विचारवंत डॉ.नागोराव कुंभार यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभाग,ग्रंथालय संचालनालय,मुंबई,लातूर जिल्हा शासकीय ग्रंथालय अधिकारी कार्यालयांच्यावतीने शनिवार,दि.१४ व रविवार,दि.१५ मार्च २०२६ या दिवशी औसा येथील श्री मुक्तेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात लातूर ग्रंथोत्सव २०२५ चे आयोजन करण्यात आले होते. त्याच्या उत्कृष्ठ वाचक सत्कार व समारोप सत्रात अध्यक्षपदावरुन डॉ.कुंभार बोलत होते. मंचावर तहसीलदार घनशाम अडसुळ,मराठवाडा ग्रंथालय संघाचे कार्यवाह राम मेकले,जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाचे अध्यक्ष प्रभाकर कापसे,युवराज हालकुडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना डॉ.नागोराव कुंभार म्हणाले की, सध्याचे युग माहिती,ज्ञान,यंत्र,तंत्रज्ञानाचे आले तरी माणसाच्या जीवनात ग्रंथांचं असलेलं अढळ स्थान ढळणार नाही.ग्रंथांमुळे व्यक्ती आणि समाजाची वैचारिक प्रगल्भता वाढीस लागते. ते आपल्याला दृष्टी देतात,ग्रंथांची साथ सोडल्यामुळे राजकीय क्षेत्रात वैचारिक दारिद्र्य वाढत आहे.समाजाला केवळ आर्थिक नव्हे तर वैचारिक दृष्ट्याही समृध्द केले पाहिजे ते काम ग्रंथालय चळवळीच्या माध्यमातून होवू शकते.पाश्चात्यांनी जगावर -ज्ञानाच्या सामर्थ्यानेच अधिराज्य केल्याचा इतिहास आहे.आज तत्व,ज्ञान आणि मूल्यांकडे दुर्लक्ष होत असताना ग्रंथालये साह्यभूत भूमिका वाढवत आहेत.मानव जातीला सुसंस्कृत करण्याचे काम ग्रंथांमुळे होते.माणसाला विचार देण्याचे,आकलन क्षमता वाढविण्याचे,अभिव्यक्त होण्याचे आणि माणसांमध्ये कारुण्य भावना जागविण्याचे कामही ग्रंथ करतात, एकूणच काय तर ग्रंथ हे मानव जातीला तारक ठरणारे ज्ञान,मूल्यही देतात असे सांगत अशा ग्रंथोत्सवामुळे ज्ञानाची देवाण-घेवाण होण्यास मदत होत असल्याचेही डॉ.कुंभार यांनी सांगितले.

या सत्रारंभी जिल्हा ग्रंथालय अधिकारी वंदना काटकर यांनी दोन दिवशीय ग्रंथोत्सवानिमित्त काढलेली ग्रंथ दिंडी,ग्रंथ प्रदर्शन व विक्री,विविध परिसंवाद,कविसंमेलन व ग्रंथोत्सवाच्या आयोजनाची माहिती प्रास्ताविकात दिली.यावेळी मान्यवरांचा ग्रंथ,स्मृतीचिन्ह देवून स्वागत करण्यात आले नंतर जिल्ह्यातील उत्कृष्ठ वाचकांचा व ग्रंथोत्सवासाठी सहकार्य करणाऱ्यांचा मान्यवरांच्या हस्ते प्रतिनिधिक स्वरुपात सन्मानपत्र,स्मृतीचिन्ह देवून गौरव करण्यात आला.

तत्पूर्वी ग्रंथोत्सवाच्या दुसऱ्या दिवसाच्या पहिल्या सत्रात प्राचार्य डॉ.मधुकर सलगरे यांच्या अध्यक्षतेखाली ऐतिहासिक स्त्रियाः वारसा आणि कर्तृत्व या परिसंवादामध्ये डॉ.अशोक नारनवरे,डॉ.विवेक सौताडेकर यांची भाषणे झाली.डॉ.नारनवरे यांनी मनुस्मृतीने अस्तिव हिरावलेल्या स्त्रियांच्या कर्तृत्वाला तेजोमय करण्याचे काम आधुनिक काळात म. फुले आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केल्याचे सांगितले. डॉ. सौताडेकर यांनी प्राचीन ते आजचा ग्रंथोत्सव आयोजक महिलांच्या कार्यकर्तृत्वावर प्रकाश टाकला. ज्येष्ठ कथाकार जी.जी.कांबळे यांच्या अध्यतेखाली कथाकथन सत्र पार पडले.यात अंबादास केदार यांनी सालगडी, सतीष सुरवसे यांनी भानामती तर जी.जी. कांबळे यांनी डागडर या कथा सादर करुन उपस्थितांच्या टाळ्या मिळवल्या.

ग्रंथमित्र पांडुरंग अडसुळे यांच्या अध्यक्षतेखाली कृत्रिम बुध्दिमत्ताःवाचन संस्कृतीस आव्हान या विषयावरील झालेल्या परिसंवादात प्रा.डॉ.संभाजी पाटील आणि डॉ.रत्नाकर बेडगे यांची विचार मांडून,कृत्रिम बुध्दीमत्ता ही परिपूर्ण नाही. ती आपली ज्ञानलालसा पूर्ण करु शकत नाही.ग्रंथालाय पर्याय ठरू शकत नाही.त्यामुळे आपल्यातली सृजनशिलता,मानवी भावभावना जोपासू शकत नाही असे मते त्यांनी मांडली.या सत्राचे सूत्रसंचालन शादुल शेख यांनी केले. आभार प्रदर्शन सुधीर आचार्य यांनी केले. राष्ट्रगीताने या ग्रंथोत्सवाचा समारोप करण्यात आला.

दोन दिवस चालेल्या या लातूर ग्रंथोत्सव २०२५ च्या यशस्वीतेसाठी मुक्तेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिवलिंग औटी, सचिव रविशंकर राचट्टे,प्राचार्य एस.एम. जलसगरे,ॲड.मुक्तेश्वर वाघदरे,युवराज हालकुडे,मसाप जिल्हाध्यक्ष योगीराज माने,महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे कार्यो पाध्यक्ष राम मेकले,जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाचे अध्यक्ष प्रभाकर कापसे,हावगीराव बेरकीळे,उपाध्यक्ष युवराज जाधव, कोषाध्यक्ष राम मोतीपवळे,सहकोषाध्यक्ष काशीनाथ बोडके,संचालक गुप्तलिंग स्वामी,अजित पाटील, बाळकृष्ण होळीकर, श्रीधर स्वामी, संतोष करमले, घोगरे,वैशाली दुरुगकर, सूर्यकांत शिरसे, ग्रंथमित्र पांडुरंग अडसुळे, सूर्यकांत जाधव, वैजवाडे, विकास चिरके, बाजीराव चिरके,गिरीधर जंगाले,आत्माराम कांबळे, कमलाकर सावंत, पी.सी.पाटील, प्रा.राम चौधरी, डॉ.सुधीर गरड, धनंजय पवार, शैलजा कारंडे, निवृत्ती कोंपले, संजय सूर्यवंशी, गणेश बोडके, दिनेश पाटील,विठ्ठल कटके, नामदेव कास्ते,चंद्रकांत ढगे,योगेश पाटील,विमल देशपांडे, नागेश्वरी पांचाळ, मनिषा भिसे,अंजू शेटे, मीना मदनूरे, विश्वंभर वराट,मच्छिंद्र पिंपळे,राजेंद्र कोरे,हिरालाल पाटील तसेच विकास वाचनालय,कै.रामदास नाईक सार्व.वाचनालय,डॉ.बाबासाहेबआंबेड कर वाचनालय,व शाह जमाल रसूल कादरी पब्लिक लायब्ररीचे पदाधिकारी,कर्मचारी आदिंनी सहकार्य केल्याचे जिल्हा ग्रंथालय अधिकारी वंदना काटकर यांनी सांगितले.

# अभिमानास्पद ! मुबंईच्या भक्ती महाकुंभात घुमणार संत नरहरी महाराजांच्या भक्तीचा जयघोष !

'' देह देवाचे मंदिर, आत आत्मा परमेश्वर '' हा समतेचा आणि शुद्ध भक्तीचा विचार देणारे महाराष्ट्रातील थोर संत शिरोमणी नरहरी महाराज यांच्या भक्तीचा सुगंध आता देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईत दरवळणार आहे. मुबंईत वरळी येथे आयोजित भक्तीचा महाकुंभ सोहळ्यात महाराष्ट्रातील निवडक १० संतांच्या पादुकामध्ये आपल्या आराध्य दैवताचा समावेश होणे हा केवळ सोनार समाजाचा नव्हे तर वारकरी परंपरेचा गौरव आहे. सोलापूर आणि महाराष्ट्रातील तमाम सोनार बांधवासाठी अत्यंत आनंदाची आणि अभिमानाची बातमी आहे. दैनिक सकाळ समुहाच्या वतीने मुंबईतील वरळी येथील एन एस सी आय डोम, ( नेहरू तारांगण जवळ ) येथे दिनांक २१ आणि २२ मार्च रोजी भक्तीचा महाकुंभ हा अपूर्व सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्याचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे महाराष्ट्राच्या मातीतील १० थोर संतांच्या आणि ११ महान गुरूच्या पांदुकांचे दर्शन एकाच छताखाली भाविकांना घेता येणार आहे. विशेष गौरवाची बाब म्हणजे या १० निवडक संत पादुकामध्ये आपल्या सोनार समाजाचे आराध्य दैवत '' संत शिरोमणी नरहरी महाराज, पंढरपूर '' यांच्या पादुकांचा समावेश करण्यात आला आहे. हा केवळ उत्सव नाही तर समाजाचा गौरव आहे. संत शिरोमणी नरहरी महाराजांनी देह देवाचे मंदिर, आत आत्मा परमेश्वर हा विचार जगाला दिला. त्यांच्या भक्तीचा सुगंध आता मुंबई च्या हृदयस्थानी असलेल्या वरळीत दरवळणार आहे. महाराष्ट्रातील प्रमुख संतांच्या मांदी याळीत आपल्या आराध्य दैवताला मिळालेले हे स्थान म्हणजे संपूर्ण सोनार समाजाच्या परंपरेचा आणि श्रद्धेचा झालेला सन्मान, गौरव आहे. सेवेचा वारसा - आष्टीकर परिवाराचे समर्पण -- या ऐतिहासिक सोहळ्यासाठी श्री. संत



नरहरी महाराजांच्या पादुका घेऊन जाण्याची महत्वाची जबाबदारी श्री. संत शिरोमणी नरहरी महाराज समाधी मंदिर ट्रस्ट, महाद्वार पंढरपूर चे कार्यवाहक श्री. संजयजी आष्टीकर हे गेली तीन वर्षे पार पाडत आहेत. विशेष म्हणजे आष्टीकर परिवार ही महाराजांच्या सेवेतील तिसरी पिढी आहे. गेली अनेक दशके निष्ठेने, नम्रतेने आणि निःस्वार्थ भावनेने महाराजांची सेवा करण्याचा त्यांचा हा वारसा खरोखरच वंदनीय आहे. त्यांच्या या सेवाभावामुळेच आजही पंढरपूर येथील मंदिराचे पावित्र्य आणि व्यवस्थापन आदर्शवत आहे. श्री .संत नरहरी महाराज समाधी मंदिर समितीचे विद्यमान अध्यक्ष आदरणीय श्री. आनंदराव पालकर, माजी अध्यक्ष तथा जेष्ठ विश्वस्त श्रीं. भारतराव कारीकर, उपाध्यक्ष मोहनराव मंद्रूपकर, खजिनदार सुरेशराव पंडित, लोकल ऑडिटर गणेश भास्करे, जेष्ठ विश्वस्त सुभाषदादा वेदपाठक,.जितेंद्र कासेगावकर, श्री. राजन दीक्षित, श्री.दिलीप पोतदार,वसंतराव बारसकर आणि सौ. अंजली वेदपाठक तसेच सल्लागार दीपक नाना वेदपाठक, संजय क्षीरसागर, संजय रोपळकर, मनोज कासेगावकर, आणि संजय वेदपाठक यांच्या मार्गदर्शनाखाली मंदिराचे कार्य आणि संतांचा विचार सर्वदूर पोहचत आहे. त्यांच्याच प्रेरणेने हा पादुका सोहळा मुंबईतील भक्ती कुंभात सहभागी होत आहे. अनेक कारणामुळे ज्या समाज बांधवाना पंढरपूर ला जाऊन दर्शन घेणे शक्य होत नाही त्यांच्यासाठी ही एक सुवर्ण संधीच आहे. आपल्या लाडक्या संतांच्या पादुका स्वतः आपल्या भेटीला मुंबईत येत आहेत. सोलापूर सोनार समाज संस्थेचे अध्यक्ष वसंत पोतदार यांनी सर्व समाज बांधवाना आवाहन केले आहे की, मुंबई आणि परिसरातील तसेच पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ, आणि उत्तर महाराष्ट्रातील जास्तीतजास्त समाज बांधवानी या सोहळ्याला उपस्थित राहून आपल्या आराध्य दैवताच्या पादुकाचे दर्शन घ्यावे आणि या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार व्हावे. या सोहळ्याचे अधिक माहितीसाठी भाविकांनी कार्यवाहक श्री. संजयजी आष्टीकर मोबाईल नंबर ९९२१४ ३०१४९ यावर संपर्क साधावा ही विनंती.

– वसंत पोतदार, अध्यक्ष
सोनार समाज संस्था, सोलापूर
मोबाईल – ९४२३० ६५९१५

# मटण खाल्ल्यानंतर चुकूनही करु नका या गोष्टी; अन्यथा पडेल महागात

भारतीय घरांमध्ये आठवड्याच्या शेवटी चिकन आणि मटण बनवणे सामान्य आहे. जवळजवळ प्रत्येक घरात रविवारी चिकन किंवा मटण तयार केलं जातं. काही लोक आठवड्यातून तीन किंवा चार दिवस मांसाहारी पदार्थ खातात. हे आरोग्यासाठी फायदेशीर ठरू शकते, परंतु तज्ञ म्हणतात की, जर ते अयोग्यरित्या खाल्लं तर हानिकारक देखील ठरू शकते. हो, मटण खाल्ल्यानंतर काही पदार्थ खाल्ल्याने तुमच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ शकतात. चला जाणून घेऊया ते पदार्थ कोणते आहेत. विशेषत: जेव्हा आपण चिकन किंवा मटण सारखे मांसाहारी पदार्थ खातो तेव्हा अगदी लहानसहान चुकांमुळेही अपचन, पोटफुगी, गॅस आणि त्वचेच्या समस्या उद्भवू शकतात. मटणामध्ये प्रथिने आणि लोहाचे प्रमाण जास्त असते, त्यामुळे ते पचायला जास्त वेळ लागते. म्हणूनच आपण मटण खाल्ल्यानंतर लगेच काही पदार्थ खाणे टाळले पाहिजे. अन्यथा अपचन सारख्या समस्या उद्भवू शकतात.काही लोक मटण किंवा चिकन सारखे मांसाहारी पदार्थ खाल्ल्यानंतर लगेचच दूध, दही किंवा ताक पितात. परंतु, तज्ञांचं म्हणणं आहे की, हे अजिबात आरोग्यदायी नाही. तज्ञांचं म्हणणं आहे की, मांसाहारी जेवणानंतर हे पदार्थ खाल्ल्याने पचनक्रिया मंदावते आणि पोटफुगी, अतिसार आणि त्वचेवर पुरळ उठणे यासारख्या समस्या उद्भवू शकतात.

मटण खाल्ल्यानंतर मध खाणे देखील आरोग्यासाठी हानिकारक आहे असं तज्ञांचं म्हणणं आहे. मधात शरीरातील उष्णता वाढवण्याचे गुणधर्म असतात. मटणसोबत मिसळल्यास ते शरीरातील उष्णता आणखी वाढवते. यामुळे छातीत जळजळ आणि अस्वस्थता निर्माण होऊ शकते. म्हणून, जर तुम्हाला मटण खाल्ल्यानंतर मध खाण्याची सवय असेल तर ते ताबडतोब थांबवा.एवढेच नाही तर मटण खाल्ल्यानंतर केळी आणि गोड पदार्थ देखील टाळावेत. तज्ञांचं म्हणणं आहे की, मटण पचण्यास जास्त वेळ लागतो, म्हणून ते लगेच खाल्ल्याने पोटाच्या समस्या उद्भवू शकतात आणि तुम्हाला अस्वस्थ वाटू शकते. म्हणून मटण खाल्ल्यानंतर थोडा वेळ विश्रांती घ्या आणि जे हवे ते खा. रात्री मटण खाणं चांगलं नाही असं डॉक्टरांचं म्हणणं आहे. मटण खाल्ल्यानंतर लगेच भरपूर पाणी पिणे आवश्यक आहे. जर तुम्हाला खाल्ल्यानंतर पोटात जडपणा जाणवत असेल तर तुम्ही आले किंवा मेथीचा काढा पिऊ शकता, असं तज्ञांचं मत आहे.हिवाळ्यात मटण खाण्याचे फायदे: पोषणतज्ञ डॉ. सुचरिता सेनगुप्ता म्हणतात की हिवाळ्यात मटण खाणे फायदेशीर आहे. हिवळ्यात पाया सुप अधिक फायदेशीर मानला जातो. मटण खाल्ल्याने उबदारपणा आणि शाश्वत ऊर्जा मिळते, कारण त्यात प्रथिने, लोह, जस्त आणि व्हिटॅमिन बी१२ भरपूर असते. हे पोषक घटक थकवा दूर करण्यास, रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यास आणि शरीराचे मुख्य तापमान राखण्यास मदत करतात, जे थंडीपासून संरक्षण करण्यास आणि अशक्तपणा दूर

**जेवणानंतर खरंच चार पटीने वाढतो हार्ट अटॅकचा धोका? संशोधन काय सांगते?**

बदलती जीवनशैली आणि खाण्यापिण्याच्या चुकीच्या सवयींमुळे विविध आजारांचे प्रमाण वाढले आहे. शरीराला निरोगी ठेवण्यासाठी बाहेरचे खाणे टाळावे, असा सल्ला आरोग्य तज्ज्ञांकडून नेहमीच दिला जातो. तरीदेखील काहीजण त्याकडे सर्रासपणे दुर्लक्ष करताना दिसून येतात. यादरम्यान जगभरातील खवय्यांची चिंता वाढवणारा अहवाल अमेरिकन हार्ट असोसिएशनच्या परिषदेत सादर करण्यात आला आहे. गरजेपेक्षा जास्त जेवण केल्याने अवघ्या दोन तासांत हृदयविकाराचा झटका चार पटीने वाढतो, असे या अहवालात नमूद करण्यात आले आहे. यापार्श्वभूमीवर संशोधकांनी खवय्यांना नेमका काय सल्ला दिला? त्याविषयीचा हा आढावाष्ठ

**हृदयविकाराचा धोका कशामुळे वाढतो?**

करोना महामारीच्या काळानंतर जगभरात हृदयविकाराचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. भारतात दरवर्षी हार्ट अटॅकमुळे अनेकांचा मृत्यू होत असल्याचे समोर आले आहे. आहाराची चुकीची पद्धती आणि जीवनशैलीतील बदलांमुळे तरुणांमध्ये कमी वयातच हार्ट अटॅकचा धोका निर्माण होत आहे. आरोग्य चांगले राहण्यासाठी प्रत्येक पदार्थ हा चोथायुक्तच असला पाहिजे यावर अनेकांकडून भर दिला जातो. काहीजण जीभेचे चोचले पुरविण्यासाठी तेलकट तसेच चरबीयुक्त पदार्थांचे अतिसेवन करतात. परिणामी आरोग्याच्या गंभीर समस्या निर्माण होत असल्याचे आरोग्य तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

**संशोधनातून काय समोर आले?**

द वॉशिंग्टन पोस्टने दिलेल्या वृत्तानुसार, पचनास जड असलेल्या आहाराचे सेवन केल्याने अवघ्या दोन तासांत हृदयविकाराचा तीव्र झटका येण्याची शक्यता चार पटीने वाढू शकते. दिवसातले पहिले आणि शेवटचे जेवण उशिरा केल्यास हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी आजार होण्याचा धोका वाढतो आणि हा परिणाम पुरुषांपेक्षा स्त्रियांमध्ये जास्त दिसून येतो. जेवण खूप तेलकट, तुपकट किंवा साखरयुक्त असल्यास रक्तदाब तात्काळ वाढण्याची शक्यता असते. त्यामुळे हृदयाचे ठोके तीव्र होऊन हार्ट अटॅकचा धोका निर्माण होऊ शकतो, असे नव्या संशोधनातून समोर आले आहे. पचनास जड असलेले पदार्थ खाल्ल्याने रक्तामध्ये चरबीचे प्रमाण अचानक वाढते आणि रक्तवाहिन्या आकुंचन पावतात, ज्यामुळे हृदयावर प्रचंड ताण येतो आणि काही काळासाठी हार्ट अटॅकचा धोका झपाट्याने वाढतो, असेही अमेरिकन हार्ट असोसिएशनच्या परिषदेत सादर केलेल्या अभ्यासात नमूद करण्यात आले आहे.

**जेवणानंतर हार्ट अटॅक कसा येऊ शकतो?**

जेवणात एकाच वेळी खूप जास्त कॅलरी असलेल्या पदार्थाचा समावेश केल्याने पचनक्रियेसाठी सामान्यपेक्षा जास्त वेळ आणि ऊर्जा लागते, ज्यामुळे पचनसंस्थेवर आणि हृदयावर अतिरिक्त ताण येतो आणि मोठ्या प्रमाणात रक्त पोटाकडे वळते. या अचानक वाढलेल्या रक्तपुरवठ्यामुळे हृदयाला अधिक वेगाने आणि जास्त जोरात धडधडावे लागते. परिणामी रक्तदाब वाढतो आणि हृदयाला आवश्यक असलेल्या मार्गावरच अडथळा येतो. या प्रक्रियेमुळे हृदयविकार, उच्च कोलेस्टेरॉल किंवा ब्लॉकेजचा त्रास असलेल्या रुग्णांच्या धमनींमध्ये साठलेले कोलेस्टेरॉलचे थर (प्लाक) अचानक फुटून रक्ताची गुठळी तयार होऊ शकते. ही गुठळी हृदयाकडे होणारा रक्तप्रवाहाला अडथळा आणण्याची शक्यता असल्याने हृदयविकाराचा तीव्र झटका येण्याचा धोका वाढतो, असा इशाराही संशोधकांनी दिला आहे.

**हृदयविकाराचा सर्वाधिक धोका कुणाला?**

प्रत्येकाला चरबीयुक्त पदार्थाचा गंभीर धोका नसला तरी आधीच हृदयविकार आणि उच्च रक्तदाब असलेल्या व्यक्तींसाठी ते धोकादायक ठरू शकते. शिवाय उच्च कोलेस्टेरॉल किंवा मधुमेहाचा सामना करणाऱ्या व्यक्तींनादेखील चरबीयुक्त पदार्थाच्या सेवनाचा मोठा धोका असतो. या समस्यांचा सामना करणाऱ्या व्यक्तींच्या हृदयावर आधीच ताण वाढलेला असल्याने पचनासाठी जड असलेले पदार्थ त्यांच्यासाठी धोकादायक ठरू शकतात, असा निष्कर्ष संशोधकांनी अभ्यासातून काढला आहे. हृदयविकाराची लक्षणे लगेच दिसत नसली तरीही जेवणानंतर त्वरित त्याचा धोका वाढण्याची शक्यता असते. कारण- चरबीयुक्त पदार्थामुळेच हृदयाचे ठोके आणि रक्तदाब वाढू शकतो. त्यातच रक्ताच्या गुठळ्या तयार होण्यास अनुकूल परिस्थिती निर्माण झाल्याने अनेक तासांपर्यंत हृदयविकाराचा धोका निर्माण होऊ शकतो, असेही संशोधकांनी म्हटले आहे.

**तज्ज्ञांनी नेमका काय सल्ला दिला?**

पचनास जड असलेले पदार्थ सर्वांसाठीच धोकादायक नसतात. प्रत्येकाचे शरीर हृदयविकाराचा गंभीर धोका परिणामांशिवाय सहजपणे हाताळू शकतात. तरीही उच्च रक्तदाब किंवा मधुमेहाचा त्रास असलेल्या व्यक्तींनी मसालेदार किंवा अतितेलकट पदार्थांचे सेवन टाळावे. दिवसभरात छोटे पण पौष्टिक असे जेवण घ्यावे, रात्री उशिरा किंवा रिकाम्या पोटी खूप मोठे जेवण घेऊ नये. आधीपासून हृदयविकाराचा धोका असलेल्यांनी विशेष काळजी घ्यावी, असा सल्ला तज्ज्ञांनी दिला आहे. सणासुदीच्या काळात किंवा लग्नसमारंभात जबरदस्तीने ताटात जेवण वाढले जाते. त्यांचे मन राखण्यासाठी अनेकदा आपल्याला इच्छा नसूनही ताटातले अन्न वाया जाऊ नये म्हणून संपवावे लागते. इच्छा नसूनही तेलकट पदार्थांचे सेवन करावे लागत असल्याने हृदयविकाराच्या घटनाही वाढताना दिसून येतात. संतुलित आहार घेतल्याने आणि नियमित व्यायाम केल्याने हार्ट अटॅकचा धोका टाळता येऊ शकतो, असेही अभ्यासात नमूद करण्यात आले आहे.

**हृदयविकाराचा धोका टाळण्यासाठी काय करावे?**

शरीराला निरोगी ठेवण्यासाठी आणि कोलेस्ट्रॉल कमी करण्यासाठी कमी फॅट्स आणि जास्त फायबर असलेले पदार्थाचे सेवन करावे असा सल्ला आरोग्य तज्ज्ञ देतात. केक, बिस्कीट, सॉसेज, बटर आणि पाम तेलापासून बनवलेले पदार्थ खाणे शक्यतो टाळावे. या पदार्थामुळे शरीरातील कोलेस्ट्रॉल झपाट्याने वाढते. हृदयविकाराचा धोका टाळण्यासाठी रोजच्या आहारात केळी, आंबा किंवा अननस यांसारख्या फळांचा समावेश करावा. या फळांचे सेवन केल्यास फक्त कोलेस्ट्रॉलच नाही, तर हृदयविकाराचा धोकाही कमी होऊ शकतो, असे एका आरोग्य तज्ज्ञाने सांगितले. केळींमध्ये फायबर आणि पोटॅशियम हे घटक मोठ्या प्रमाणात असतात. त्यामुळे रक्तदाब कमी करण्यास आणि धमन्यांमधील वाईट कोलेस्ट्रॉल बाहेर टाकण्यास मदत मिळते. आंब्यामधील व्हिटॅमिन सी हा घटक शरीरातील रक्ताभिसरण प्रक्रिया सुधारतो आणि खराब कोलेस्ट्रॉलचे प्रमाण कमी करून, हृदयविकाराचा धोकाही कमी करतो. अननसामध्ये असलेले ब्रोमेलिन हे खास एंझाइम रक्तातील वाईट कोलेस्ट्रॉल कमी करण्यासाठी अत्यंत परिणामकारक मानले जाते, असेही ते म्हणाले.

## अल्झायमरसह या आजारांसाठी ध्यान सर्वात प्रभावी माध्यम



ध्यानाचे फायदे: या धावपळीच्या जीवनात शांती मिळवणे दिवसेंदिवस महत्वाचे होत चालले आहे, पण कठीणही आहे. वाढत्या ताणतणाव, चिंता आणि अस्वास्थ्यकर जीवनशैलीमुळे, तरुण वयातच आजार उद्भवू लागले आहेत. अशा काळात, ध्यान केवळ मानसिक व्यायाम म्हणून नव्हे तर एक समग्र जीवनशैली म्हणून उदयास येत आहे. प्राचीन काळात, ऋषी-मुनींनी ध्यानाद्वारे केवळ आध्यात्मिक शांती मिळवली नाही तर शारीरिक आजारांवरही नियंत्रण मिळवले. जास्त विचार करताय? तुमचे मन शांत आणि आनंदी ठेवण्यासाठी दररोज हे ७ सोपे योगासन करा आज, जेव्हा वैद्यकीय विज्ञानानेही त्याची शक्ती मान्य केली आहे, तेव्हा ध्यान ही एक नैसर्गिक उपचारपद्धती आहे, कोणत्याही औषधाशिवाय आणि कोणत्याही दुष्परिणामांशिवाय यात काही शंका नाही. आज, आपण सहा आजारांवर चर्चा करू ज्यांच्यासाठी ध्यान वैज्ञानिकदृष्ट्या प्रभावी सिद्ध झाले आहे. त्यापैकी पहिला अल्झायमर आहे, जो हळूहळू आपली स्मरणशक्ती हिरावून घेतो. या लढाईत ध्यान तुम्हाला आणि तुमच्या मेंदूला कसे बळकटी देते ते पाहूया. यह वीनर्स नकली दांतों से ३०० गुना बेहतर है! और कीमत बहुत सस्ती हैअधिक जानें-१. अल्झायमर आणि ध्यान यांच्यातील अनोखा संबंध. अल्झायमर रोग हा मेंदूचा एक आजार आहे ज्यामध्ये व्यक्तीची स्मरणशक्ती आणि विचार करण्याची क्षमता हळूहळू कमी होते. ही समस्या प्रामुख्याने वृद्धांमध्ये दिसून येते, परंतु आजच्या तणावपूर्ण जीवनशैलीत, ती तरुणांवरही परिणाम करत आहे. ध्यान, विशेषतः कीर्तन क्रिया ध्यान, जर दररोज १२ मिनिटे केले तर, स्मरणशक्ती आणि एकाग्रतेसाठी जबाबदार असलेल्या मेंदूच्या भागाला सक्रिय करते. वैज्ञानिक संशोधनातून असे दिसून आले आहे की ध्यान मेंदूच्या हिप्पोकॅम्पस क्षेत्रातील राखाडी पदार्थ वाढवते, जे अल्झायमरची लक्षणे रोखू शकते किंवा कमी करू शकते.व्यायाम न करता निरोगी राहण्यासाठी योगाच्या या टिप्स अवलंबवा **(क्रमशः उद्याच्या अंकात )**

# आईच्या संरक्षणासाठी जीव दिला



मनुष्याच्या विकासात आई-वडिलांची महत्वाची भूमिका असते. ते मुलांना वाढवतात व त्यांना स्वत:च्या पायावर उभे राहण्यास सक्षम बनवतात. तसेच मरेपर्यंत आपल्या मुलांच्या कल्याणाचीच प्रार्थना करतात. जगातील सर्व देवता, पैगंबर, साधु-संत व महापुरुषांनी आई-वडिलांच्या सेवेस पुण्य कर्म संबोधले आहे. भगवान बुद्धांनी देखील या सत्याचा अनुभव केला होता म्हणून त्यांनी जीवनात आई-वडिलांना महत्वपूर्ण स्थान दिले. आपल्या उपदेशात ते नेहमी आई-वडिलांची सेवा करण्यास सांगत होते. बौद्ध धर्माचा ग्रंथ सुत्तानिपातच्या पराभव सुत्तात भगवान बुद्धांनी देवास उपदेश देत सांगितले आहे की, जो व्यक्ती आपल्या आई-वडिलांचा सांभाळ किंवा पालन-पोषण करत नाही, त्याचा नाश निश्चित असतो.

या ग्रंथाच्या महामंगल सुत्तात बुद्ध म्हणतात की, आई-वडिलांची सेवा करणे सर्वोच्च मंगल कार्य आहे. धम्मिक सुत्तात गृहस्थ धर्माची व्याख्या करत ते सांगतात की, जो धर्मानुसार आई-वडिलांची सेवा करतो, तो स्वयंप्रभ नावाच्या देवलोकात उत्पन्न होतो. बौद्ध धर्माचा प्रसिद्ध ग्रंथ धम्मपदात बुद्ध सांगतात, जगात आई-वडिलांची सेवा सुखकर असते. बुद्धांनुसार आई-वडिलांचे स्थान सर्वोच्च असते. आई-वडिल आपल्या मुलांचे पालनपोषण करुन मोठे करतात, त्यांना जीवनात अग्रेसर राहण्यासाठी समर्थ बनवतात व जीवनभर त्यांना आशिर्वाद देतात. आई-वडिल वृद्ध व असहाय झाल्यावर त्यांची सेवा करणे मुलांचे नैतिक कर्तव्य असते. जर त्यांनी नैतिक कर्तव्याचे पालन केले नाही तर ते अधर्माचे भागीदार होतात व समाजात त्यांची निंदा होते.

बुद्ध याबाबतीत खुप संवेदनशील होते म्हणून त्यांनी व्यवस्था दिली की, व्यक्ती आपल्या आई-वडिलांच्या परवानगीशिवाय भिख्खुसंघात दीक्षा घेऊ शकत नाही. याचे तात्पर्य व्यक्ती आपल्या आई-वडिलांप्रती कर्तव्य सोडून भिक्खु बनू शकत नाही. बुद्धांने गृहस्थासाठी दिलेल्या तत्वात आई-वडिलांची सेवा प्रथम होती. प्राचीन भारतात आई-वडिलांची सेवा सर्वात मोठे मूल्य मानले जात होते. या मूल्याच्या प्रचार-प्रसारासाठी पुराण व बौद्ध जातक कथांमध्ये अनेक प्रसंग मिळतात, ज्याच्या माध्यमातून यास जास्त व्यावहारिक बनवले जाऊ शकेल. श्रवणकुमारची गोष्ट सर्वांना माहित आहे. येथे अनेक लोककथा व लोकगीतांमध्ये आई-वडिलांच्या सेवाचा उल्लेख करण्यात आला आहे. जातक कथांमध्ये असे अनेक संदर्भ मिळतात, ज्यात बोधिसत्वांनी आपल्या आई-वडिलांच्या सेवेत जीवनाची आहुती दिली होती. चुल्लनन्दिय जातकात बोधिसत्व हिमालयात नन्दिय वानर होते. त्यास छोटा भाऊ होता. ते दोघे ८० हजार वानरांचे नेतृत्व करत असल्यामुळे आपल्या आंधळ्या आईची सेवा पूर्ण वेळ करु शकत नव्हते म्हणून त्यांनी वानरांचे नेतृत्व सोडून पूर्ण वेळ आईची सेवा करण्यास सुरुवात केली.

एकेदिवशी एक शिकारी, शिकारीच्या शोधात बोधिसत्व आई व छोट्या भावासह राहत असलेल्या झाडाखाली आला. शिकारीचे लक्ष त्याच्या आईकडे गेले व त्याने आईच्या दिशेने बाण साधला. मातृभक्त नन्दिय शिकारीसमोर येऊन म्हणाला की, हवं तर मला मार पण माझ्या आईला सोड. निर्दयी शिकारीने बोधिसत्वाची हत्या केली. त्यानंतर शिकारीने छोटा भाऊ व आईला मारले. आई, बोधिसत्व व भावाच्या हत्येच्या महापापामुळे त्यावेळी भयंकर वादळ आले, ज्यात शिकारीचे संपूर्ण कुटूंब मरण पावले. नंतर तुटलेल्या घराच्या खांबाखाली दबून तो पापी शिकारी सुद्धा मरण पावला. आज काही लोक आपल्या आई-वडिलांना घराबाहेर काढतात. काही त्यांची संपत्ती बळकावून त्यांना वृद्धाश्रमात पाठवतात. पण त्यांना हे माहित नसते की, त्यांचे मुलं भविष्यात त्यांच्यासोबत

# नाचक्की आणि नामुष्की



आपल्या मर्यादा लक्षात घेऊन इराणने युद्धतंत्र बदलले. इराणकडून आर्थिक युद्ध सुरू आहे आणि जमेल तसे लष्करी युद्ध चालवले जात आहे. अमेरिकेच्या ओंजळीने पाणी पिणार्या आखाती देशांवरील हल्ले हा आर्थिक युद्धाचा भाग. इराण आणि इस्रायल-अमेरिका युद्धाने जगाला संकटात ढकलले आहे. स्वतः ला अतिबुद्धिमान म्हणवून घेणार्या डोनाल्ड ट्रम्प यांचे हे पाप! अमेरिकेचे आधीचे अध्यक्ष मूर्ख होते, त्यांनी इराणला मोकळे सोडले, असा कांगावा ट्रम्प यांनी सुरू केला. इराणवरील हल्ल्याच्या इस्रायलच्या घातक निर्णयात सहभागी होत त्यांनी स्वतःचा पाय गाळात घातला आहे. तिसर्या दिवशी इराण माझ्या पायाशी येईल, ही या गृहस्थांची दर्पोक्ती होती. आता युद्धाला पंधरा दिवस उलटूनही इराणला नमवता आलेले नाही. जग एक ध्रुवीय करायला निघालेल्या ट्रम्प यांच्या मुजोरीला मिळालेले हे उत्तर आहे. युद्धाचे चटके सर्व देशांना बसण्यास सुरुवात झाली असताना होर्मुझची सामुद्रधुनी बंद करून इराणने तेलाचा पुरवठा रोखला आणि जगाचा श्वास गुदमरू लागला. युक्रेनला रशियाच्या अंतर्गत भागात हल्ले करणे सोपे जावे यासाठी अमेरिकेने उपग्रहांद्वारे मिळणार्या माहितीसह अत्याधुनिक शस्त्रे पुरवली. ही बदमाशी करणार्या, आर्थिक मालमत्ता गोठवून रशियाला कोंडीत पकडणार्या अमेरिकेवर रशियाची याचना करण्याची वेळ आली! इराण अद्याप लढत आहे, यामागे रशिया आणि चीनची मदत आहे, असे सांगण्यात येते. पडद्यामागून युक्रेनचे युद्ध अमेरिका आणि पाश्चात्त्य देश लढत असतील, तर इराणचे युद्ध रशिया आणि चीनने लढण्यात गैर काय? 'ब्रिक्स'चे अध्यक्षपद भारताकडे आहे. होर्मुझच्या सामुद्रधुनीत भारतीय तेल जहाजांना संरक्षण राहील, मित्र देश म्हणून आम्ही तशी परवानगी देत आहोत, असे इराणने म्हटले आहे. या पार्श्वभूमीवर भारताने युद्धाबाबत अतिसावध भूमिका घेण्याची गरज नव्हती; पण युद्धात इस्रायल असल्याने येथील काही घटकांना युद्ध समर्थनीय वाटते. इस्रायलने जे झेलले त्या धार्मिक दहशतवादाची होरपळ भारतानेही अनुभवली; पण विषारी मानसिकतेचा पाकिस्तानचा लष्करप्रमुख अमेरिकेला सोबती वाटतो, ही विसंगती सर्वसामान्य भारतीयांना तरी खटकते.

**न्याय्य बाजू घ्यावी** -इस्रायलबरोबर सहकार्य, मैत्री कोणत्या मर्यादेपर्यंत करावी, हा वेगळा भाग. मात्र; जेथे अमेरिकेचा संदर्भ आहे त्या प्रत्येक ठिकाणी भारताने जे न्याय्य आहे त्याचीच बाजू घेतली पाहिजे. दुर्मिळ खनिज संपत्ती हवी म्हणून आज या देशावर हल्ला, तेलाची गरज भागणार म्हणून दुसर्या देशात घुसखोरी, देशाचे अर्थकारण बुडू नये यासाठी खनिज साठ्याने समृद्ध असलेल्या ग्रीनलँडवर नजर, ही दादागिरी जग मुकाट्याने खपवून घेणार का? 'शांततेचा दूत' म्हणविणार्या ट्रम्प यांच्याएवढी युद्धखोर व्यक्ती जगाने पाहिली नाही. आजवर व्हिएतनाम, अफगाणिस्तानसह अनेक ठिकाणी अमेरिकेची नाचक्की झाली; पण इराणमुळे तर अमेरिकेच्या मर्यादाही उघड झाल्या आहेत. होर्मुझची सामुद्रधुनी खुली करण्यासाठी चीनने युद्धनौका तैनात करावी, अशी ट्रम्प यांची अपेक्षा होती. चीनने नकार दिलाच; पण अमेरिकेचा मित्र असलेल्या ब्रिटनने देखील अमेरिकेची मागणी सरळसरळ धुडकावली. एवढी अपमानास्पद स्थिती अलीकडच्या काळात अमेरिकेने कधीही अनुभवली नव्हती. केवळ ट्रम्प यांच्यामुळे ती वेळ आली आहे. इराणच्या बाबतीत लष्करी लक्ष्य आम्ही साध्य केले, असे पेंटेगॉनचे, अर्थात अमेरिकेच्या संरक्षण विभागाचे म्हणणे आहे. त्यांचा अहवाल फोडण्यात आला आहे आणि राजकीय बदलाचे उद्दिष्ट साध्य झालेले नाही, असे सूचित करण्यात आले आहे. तो रोख 'महाबुद्धिमान' ट्रम्प यांच्याकडे आहे. आयतुल्ला खामेनींसह नंतरच्या फळीतील नेतृत्व संपवून देखील इराणमध्ये सत्तापालट झाला नाही. तो करायचा असेल, तर अमेरिकेच्या सैन्याला इराणमध्ये उतरावे लागेल. क्षेपणास्त्र हल्ल्यांतून ते साधणार नाही. इराणच्या भूमीवर प्रत्यक्ष सैन्य उतरवायचे झाल्यास फार मोठी जीवितहानी होईल आणि तेच अमेरिकेला नको आहे. अमेरिकेचे सैन्य यावे, याची इराणला प्रतीक्षा आहे. अमेरिकेला कोणत्याही दीर्घकालीन युद्धात ढकलणार नाही, असे सांगत सत्तेवर आलेल्या ट्रम्प यांना आता सुटकेचा मार्ग शोधावा लागणार आहे. त्यांची प्रत्येक धडपड त्यासाठीच असल्याचे त्यांच्या विधानांवरून लक्षात येते. हे गृहस्थ पराभवाचा तडाखा पचवता न आल्यास टोकाच्या विध्वंसाचा मार्ग अवलंबण्याची भीती आहे.

## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा

किडनी, लिव्हर, फुफ्फुसं यांच्यासाठी व या अवयवांचे आजार कमी करण्यासाठी ड जीवनसत्त्वाची भूमिका महत्त्वाची आहे. कर्करोगापासून बचावासाठी ड जीवनसत्त्व उपयुक्त आहे. हाडं ठिसूळ होणं, स्नायूंची




दुर्बलता यापासून मुक्तीसाठी ड जीवनसत्त्वाचं प्रमाण संतुलित राखणं गरजेचं आहे. रोगप्रतिकारशक्ती कमी होणं, केस गळती, थकवा, सुस्ती, अनियमित मासिक पाळीच्या समस्या ड जीवनसत्त्वामुळे दूर होतात.

## २ Joke विनोद




दोन नेते आपापासात भांडत होते.
पहिला नेता : मी तुझ्यासारखा भाषणाच्या वेळी लोकांनी फेकलेली अंडी व टॉमॅटो घरी भाजीसाठी नेत नाही.
दुसरा नेता : मी लोकांनी फेकलेल्या विटा व दगडाचे तुझ्यासारखे घर बांधले नाही.

## ३ Message संदेश



45 saal ka SANTA ladki dekhne gya, Ladki ki Maa behosh ho gyi, Hosh aya to pucha KYA HUA.?
Vo Boli: 18 saal pehle ye muje b dekhne aya tha.

## ४ Thought सुविचार




आत्मसमर्थनाने सद्गुणाची किंमत नष्ट होते.
-वोल्टेर

**संस्कृत सुभाषित**

**प्राज्ञोपसेविनं वैद्यं धार्मिकं प्रियदर्शिनम्।**
**मित्रवन्तं सुवाक्यं च सुहृदं परिपालयेत्।।**

अर्थ - विद्वानांची सेवा करणारा, धार्मिक वर्तन करणारा, ज्याचे दर्शन प्रिय असते असा, मधुर बोलणारा, दयाबुद्धी बाळगणारा असा वैद्य असावा.

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. फायदा-तोटा
५. व्यावयाम
८. युद्ध
११. रस्ता, मार्ग
१२. रूक्ष, कोरडे
१३. कारण नसताना
१४. कारस्थान
१६. नीच, दृष्ट
१८. कपोल
२१. रवाळ, कणी असलेले
२३. शरीर
२५. सारखा
२६. पराभव, ऱ्हास
२७. फुरसत
२९अ. सोलापूरचा प्रसिद्ध चटकदार पदार्थ
३०. एक चतुर्थांश
३१. गणपतीचे एक नाव
३३. पोवळे
३४. रसपूर्ण
३६. घाण
३७. नरसंहार
३८. रजतपटावरील अजरामर सौंदर्यसम्राज्ञी
४०. कणीदार
४२. उत्सव
४३. रूंद (बांधा)
४५. पांढराशुभ्र लुसलुशीत प्राणी
४७. डावा
४८. आघाताचे आयुध
४९. भारताचे पहिले पंतप्रधान
५३. एकरुप
५५. जरच्या मागेमागे येणारा अटीचा शब्द
५६. नटवा, सजावट करा
५७. बंदी, मज्जाव
५८. एक श्वासरोग
६०. नोकरी नसलेला निरूपयोगी?
६२. टक, दृष्टी
६५. कहाणी
६६. कळपातील प्रमुख हत्ती
६७. जास्वंद
६९. लोणी
७१. सीतापती
७२. दाट, ढग
७३. आचारी
७६. शूर पुरुष
७९. शिकार
८०. खोदकाम
८१. गवताचे रुंद पान
८२. एकाक्षरी प्रश्न
८३. मला
८४. प्रत्येक दिवशी
८५. मीठ, लवण
८६. चप्पल

### उभे शब्द

१. नूतन
२. मोठा दरवाजा
३. अचानक झालेला बदल
४. श्रेष्ठ पुरुष
५. लाकूड कापण्याचे हत्यार
६. मैत्रीण
७. रत्न
८. हेतू धरून केलेले कार्य
९. करपलेला, जळलेला भाग
१०. तोफगाडी
१३. नीच, दुष्ट
१५. धरणे
१७. गुजराथी नृत्यप्रकार
१९. चटकन, त्वरित
२०. गावाची हद्द
२२. सेवक
२४.'-- उतरू आलं, अंग झिम्माड झालं.'
२६. पवित्र
२८. घालविणे, गाळणे, सोडणे
२९. फुरसत
३०. बासरी
३२. नगर, मोठे गाव
३३. अत्यंत हुशार, विद्वान
३५. नमस्काराचा एक शब्द
३६. उंटाच्या पाठीवरील उंचवटा
३८. शंभर किलो
३९. खाज
४१. दावा लावणारा, वैरी
४२. कमळ, मुलीचे एक नाव
४३. --- सामने, समोरासमोर
४४. गायीचे बछडे
४५. उद्देशावाचून
४६. उंट हाकणारा
४७. एक द्विदल धान्य
४८. येरझारा, जाणे-येणे
५०. निष्णांत
५१. दिवस
५२. विरोध, प्रतिबंध
५३. सारखा
५४. अंगरखा
५९. घरातील मधली खोली
६१. फणसाच्या एक प्रकार
६३. लोकांच्या मनातील विचार
६४. आवाज, गोगाट
६८. कर्ण
७०. पाणी
७३. घशाला त्रास देणारा अळू
७४. शर्करा
७५. मागाहून, मग
७७. दारूचा एक प्रकार
७८. विद्युत
७९. शृंगार, कोल्हापुरी दागिना
८१. कालवा, लग्न

### आडवे उत्तर

१.नफा नुकसान ५.कसरत ८.समर ११.वाट १२.रखरखीत १३.अकारण १४.कपट १६.नराधम १८.गाल २१.कणीदार २३.तन २५.सम २६.पाडाव २७.सवड २९अ.भडंग ३०.पाव ३१.गणेश ३३.प्रवाळ ३४.रसवान ३६.मळ ३७.हत्याकांड ३८.मधुबाला ४०.दाणेदार ४२.सण ४३.आडवा ४५.ससा ४७.वाम ४८.गदा ४९.पंडित जवाहरलाल नेहरू ५३.समरस ५५.तर ५६.सजवा ५७.मना ५८.दमा ६०.बेकार ६२.नजर ७१.सावज ८०.खनन ८१.पात ८२.का ८३.मज ८४.रोज ८५.रामरस ८६.खेटर

### उभे उत्तर

१.नवा २.फाटक ३.कलाटणी ४.नरवर ५.करवत ६.सखी ७.रतन ८.सकाम ९.मर १०.रणगाडा १३.अधम १५.पकडणे १७.रासगरबा १९.लवकर २०.वेस २२.दास २४.नभ २६.पावन २८.वगळणे २९.सवड ३०.पावा ३२.शहर ३३.प्रकांड पंडित ३५.सलाम ३६.मदार ३८.मण ३९.कंड ४१.दावेदार ४२.सरोज ४३.आमने ४४.वासरू ४५.सहज

४६.सारवान ४७.वाल ४८.गमनागमन ५०.तरबेज
५१.वासर ५२.हरकत ५३.सम ५४.सदरा ५९.म

ाजघर ६१.कापा ६३.जनमानस ६४.रव ६८.कान
७०.नीर ७३.खाजरा ७४.साखर ७५.नंतर ७७.रम

७८.वीज ७९.साज ८१.पाट



# क्रीडा विश्व

## थोडक्यात/ संक्षिप्त

### हर्षित राणा दुखपातीमुळे संपूर्ण स्पर्धेला मुकणार

नवी दिल्ली : आयपीएल २०२६ च्या आधी



कोलकाता नाईट रायडर्सला मोठा धक्का बसला आहे. हर्षित राणा आयपीएलमधून बाहेर पडला आहे. टी२० विश्वचषकापूर्वी एका सराव सामन्यादरम्यान राणा जखमी झाला होता आणि तेव्हापासून तो खेळत नाही. राणाला वगळल्यानंतर, मोहम्मद सिराजचा विश्वचषक संघात समावेश करण्यात आला होता.तीन वेळा चॅम्पियन कोलकाता नाईट रायडर्स (केकेआर) ने हर्षित राणाच्या जागी बदली क्रिकेटपटू घेण्याचा निर्णय अद्याप घेतलेला नाही. केकेआरने झिम्बाब्वेचा वेगवान गोलंदाज ब्लेसिंग मुझारबानीला त्यांच्या संघात समावेश केला आहे. हर्षितची दुखापत केकेआरसाठी मोठा धक्का आहे, कारण आंद्रे रसेलने आयपीएलमधून निवृत्ती घेतल्यानंतर वेगवान गोलंदाज डेथ ओव्हर्स हाताळेल अशी अपेक्षा होती. २४ वर्षीय राणावर ९ फेब्रुवारी रोजी मुंबईत शस्त्रक्रिया झाली, पण तो लीगमध्ये केकेआरकडून खेळण्यासाठी वेळेत बरा होणार नाही.


### विराटच्या दुश्मनाने ४०० लोकांचा जीव घेणाऱ्या पाकिस्तानला झापलं!

नवी दिल्ली –यांच्यातील वाद आता आणखीच पेटल्याचं पहायला मिळतंय. पाकिस्तान आणि अफगाणिस्तानमधील संघर्षाची सुरुवात २२ फ ेब्रुवारी रोजी झाली होती. पाकिस्तानने अफगाणिस्तानच्या सीमावर्ती भागांमध्ये हवाई हल्ले केले होते. अशातच पाकिस्तानने अफगाणिस्तानच्या हॉस्पिटलवर हल्ला केला असून त्यात ४०० हून अधिक लोकांचा मृत्यू झाल्याची माहिती मिळतीये. अशातच आता पाकिस्तानवर मोठ्या प्रमाणात टीका होताना दिसतीये. पाकिस्तानच्या हल्ल्यानंतर क्रिकेटर राशीद खान याने महा युद्ध गुन्हाफ असल्याचं म्हटलं आहे. विशेषत: रमजानच्या पवित्र महिन्यात मानवी जीवनाची केलेली अवहेलना ही वेदनादायक आणि गंभीर चिंताजनक आहे, असंही राशीद यावेळी म्हणाला. अशातच आता विराटच्या कट्टर दुश्मनाने देखील यावर प्रतिक्रिया दिली असून पाकिस्तानला मोठी चपराक लगावली आहे. इस्रायल आणि पाकिस्तानी राजवटीमध्ये कोणताही फरक शोधणे कठीण आहे, असं नवीन उल हक याने म्हटलं आहे. नवीनने एका वाक्यात पाकिस्तानचा करेक्ट कार्यक्रम केलाय.

### विराट - रोहितसोबतच्या नात्याबद्दल कोच गौतम गंभीरचा खुलासा

मुंबई–टीम इंडियाचा हेड कोच गौतम गंभीर आणि दिग्गज क्रिकेटर्स विराट कोहली आणि रोहित शर्मा यांचे संबंध फार बरे नाहीत हे जवळपास जगजाहीर आहे. मात्र कधीही या तिघांपैकी कोणीही याबाबत अधिकृतपणे भाष्य केले नव्हते. मात्र कोलकाता येथील एका कार्यक्रमात पहिल्यांदाच गौतम गंभीरने मान्य केले की तो भारताचे स्टार क्रिकेटर विराट कोहली आणि रोहित शर्मा यांच्यासोबतचे आपले संबंध नीट सांभाळू शकला नाही.१६ मार्च रोजी एका कार्यक्रमात गौतम गंभीरने मान्य केले की, मागच्या दीड वर्षात त्याच्याकडून काही चुका झाल्या, पण त्याचा हेतू स्वच्छ होता.गौतम गंभीर काय म्हणाला?गौतम गंभीरने यात म्हटले की, 'मी माणूस आहे आणि मला सुद्धा चुका करण्याची मुभा आणि परवानगी असली पाहिजे. खेळाडूंना सुद्धा चुका करण्याचा हक्क आहे. मागच्या १८ महिन्यात माझ्याकडून सुद्धा अनेक चुका झाल्या असतील आणि त्यापासून मी कधीही मागे हटलो नाही. पण मी अनेकदा एक गोष्ट मानतो की योग्य हेतूने घेतलेला चुकीचा निर्णय स्वीकार केला जाऊ शकतो, पण चुकीच्या हेतूने घेतलेला निर्णय ड्रेसिंग रूममध्ये अजिबात स्वीकार्य नाही'.

### रोहितच्या साथीला नवा भिडू! मुंबई इंडियन्सची ही प्लेइंग ११ ठरणार गेमचेंजर,



मुंबई–इंडियन प्रीमियर लीग ही जगातील सर्वात श्रीमंत आणि मोठ्या टी२० लिगपैकी एक असून याच्या १९ व्या सीजनची सुरुवात आता २८ मार्च पासून होणार आहे. काही दिवसांपूर्वीच बीसीसीआयने आयपीएलच्या पहिल्या सत्रातील वेळापत्रक जाहीर केलंय त्यानुसार २८ मार्च ते १२ एप्रिल दरम्यान एकूण २० सामने खेळवले जातील. देशातील काही राज्यांमध्ये विधानसभा निवडणुका होणार आहेत, त्यामुळे बीसीसीआय निवडणूक आयोगाने तारखा जाहीर केल्यावर मग व्यवस्थेनुसार आयपीएलचं उर्वरित वेळापत्रक जाहीर करेल. सध्या पहिल्या सत्रात मुंबई इंडियन्सच्या (श्ल्स्रग घ्ह्ग्रहे) ४ साम न्यांचे वेळापत्रक जाहीर झालंय, त्यानुसार २९ मार्च रोजी मुंबईचा पहिला सामना खेळवला जाणार आहे. मुंबई इंडियन्सच्या खात्यात अजूनपर्यंत

## चिन्नास्वामी स्टेडियमवर आरसीबीचे सामने आयोजित करण्यास हिरवा कंदील



आयपीएल २०२६ दरम्यान बंगळुरूमधील एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचे सामने आयोजित करण्यातील सर्व अडथळे दूर झाले आहेत. फ्रँचायझी आता बंगळुरूमध्ये त्यांचे होम सामने खेळू शकेल. १६ मार्च रोजी कर्नाटक सरकारने कर्नाटक राज्य क्रिकेट असोसिएशन (केएससीए) ला अधिकृत मान्यता दिली. बंगळुरू आयपीएल २०२६ च्या लीग टप्प्यात पाच सामने आयोजित करेल. आरसीबी आपले उर्वरित तीन होम सामने रायपूरमध्ये खेळेल. गतविजेता म्हणून, प्लेऑफ आणि अंतिम सामना देखील बंगळुरूमध्येच होणार आहे.

कर्नाटक सरकारच्या मंजुरीमुळे, २८ मार्च रोजी चिन्नास्वामी स्टेडियमवर आरसीबी आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यातील सामन्याचा मार्ग मोकळा झाला आहे. सरकारने स्थापन केलेल्या तज्ञ समितीने स्टेडियममधील पायाभूत सुविधांमध्ये झालेल्या बदलांवर समाधान व्यक्त केले. त्यांनी १३ मार्च रोजी एक तपासणी केली आणि एक मॉक डेमो देखील घेण्यात आला. समितीने आपला अहवाल सरकारला सादर केला, ज्याने नंतर मान्यता दिली.

केएससीएने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, आम्हाला तुम्हाला कळवण्यास आनंद होत आहे की, विधान सौधा येथे एक बैठक झाली, ज्यामध्ये गृहमंत्री जी. परमेश्वर, तज्ञ समिती, केएससीए, आरसीबी आणि डीएनएचे प्रतिनिधी उपस्थित होते. बैठकीदरम्यान, तज्ञ समितीने एम. चिन्नास्वामी स्टेडियममधील तयारी आणि इतर पावले उचलण्याचा अहवाल सादर केला. तज्ञ समितीच्या शिफारशी आणि व्यवस्थेच्या पुनरावलोकनाच्या आधारे, गृहमंत्र्यांनी स्टेडियममध्ये आगामी आयपीएल सामने आयोजित करण्यास मान्यता दिली.

जून २०२५ मध्ये, आरसीबीने आयपीएल २०२५ चे विजेतेपद जिंकल्यानंतर, स्टेडियमजवळील उत्सवादरम्यान चेंगराचेंगरी झाली. त्यानंतर, राज्य सरकारने तेथे सामने आयोजित करण्यास बंदी घातली. या घटनेसाठी आरसीबीला जबाबदार धरले. असे मानले जात होते की आरसीबीला त्यांचे घरचे सामने दूर खेळावे लागू शकतात. पण, केएससीएने सुरक्षा उपाययोजना केल्या, ज्यामुळे सामने तेथे आयोजित करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

## भारतामच्ये होणाऱ्या आगामी आयपीएलचे सामने बंगळुरूमध्ये

कर्नाटक सरकारचा निर्णय

बंगळुरू : कर्नाटक सरकारने कर्नाटक राज्य क्रिकेट असोसिएशन (केएससीए) ला बंगळुरू येथील एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर आयपीएल २०२६ चे सामने आयोजित करण्याची परवानगी दिली आहे. आगामी हंगामातील उद्घाटनाचा सामना २८ मार्च रोजी रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि सनरायझर्स हैदराबाद (एसआरएच) यांच्यात खेळला जाईल.

केएससीएचे सचिव संतोष मेनन यांनी याबाबतची पुष्टी केली आहे. त्यांनी सांगितले की, १३ मार्च रोजी तपासणी आणि मॉक प्रात्यक्षिकानंतर तज्ज्ञ समितीने स्थळावरील पायाभूत सुविधांमध्ये केलेल्या बदलांवर ते समाधानी आहेत. याची माहिती समितीने कर्नाटक सरकारला दिली आहे. त्यानंतर सरकारने राज्य क्रिकेट असोसिएशनला एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर आयपीएल सामने आयोजित करण्याची परवानगी दिली.

चेंगराचेंगरीमुळे वाढल्या होत्या अडचणी



आरसीबीने मागील हंगामात, म्हणजेच २०२५ च्या आयपीएलमध्ये जेतेपद मिळविले होते. त्यानंतर, बंगळुरूमध्ये विजयी परेड आयोजित करण्यात आली होती. यामध्ये स्टेडियमबाहेर झालेल्या चेंगराचेंगरीत ११ जणांचा मृत्यू झाला आणि अनेक जण जखमी झाले. त्यानंतर, २०२६ च्या टी-२० विश्वचषकाचे सामने देखील बंगळुरूहून हलवावे लागले. आता स्टेडियमला सामने आयोजित करण्याची परवानगी मिळाली आहे.

गृहमंत्र्यांसोबतच्या बैठकीत निर्णय

राज्य क्रिकेट असोसिएशनने एका प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे की, सोमवारी सकाळी विधान सौध येथे कर्नाटकचे गृहमंत्री डॉ. जी. परमेश्वर आणि केएससीए, आरसीबी आणि डीएनएच्या प्रतिनिधींच्या अध्यक्षतेखाली तज्ज्ञ समितीची बैठक झाली. बैठकीदरम्यान, तज्ज्ञ समितीने एम. चिन्नास्वामी स्टेडियममध्ये घेतलेल्या तयारी आणि अन- ुपालन उपाययोजनांचा आराखडा देणारा अहवाल सादर केला. प्रसिद्धीपत्रकात पुढे म्हटले आहे की, तज्ज्ञ समितीच्या शिफारशींवर आणि व्यवस्थेचा सखोल आढावा घेतल्यानंतर, गृहमंत्र्यांनी बंगळुरूमधील एम. चिन्नास्वामी स्टेडियममध्ये आगामी आयपीएल सामने आयोजित करण्यास औपचारिक मान्यता दिली आहे.



## महिला संघासाठी अधिक कसोटी सामने आवश्यक; क्रिकेटपटू प्रतिका रावलचे वक्तव्य:

ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या पदार्पणातील कसोटीत अर्धशतक झळकावणाऱ्या प्रतिका रावलने महिला क्रिकेटच्या सक्षमीकरणासाठी जास्तीत जास्त कसोटी सामने आयोजित करण्याची आग्रही मागणी केली आहे.

नवी दिल्ली–महिला क्रिकेटला कसोटी सामन्यांची अधिक गरज; युवा खेळाडू प्रतिका रावलचे रोखठोक मत. (छायाचित्र– लोकसत्ता टीम)

नवी दिल्ली : ऑस्ट्रेलियाविरुद्ध नुकत्याच झालेल्या कसोटी क्रिकेट साम न्यादरम्यान पदार्पणातच अर्धशतकी खेळी करणाया प्रतिका रावलच्या मते महिला संघासाठी जास्तीत जास्त कसोटी सामन्यांचे आयोजन करण्यात यावे. प्रतिकाने या महिन्याच्या सुरुवातीला ऑस्ट्रेलियाविरुद्ध दिवस–रात्र कसोटी सामन्याच्या दुर्सया डावात ६३ धावांची खेळी केली.''कसोटी क्रिकेटमधील महत्त्वाचे प्रारूप आहे. लहानपणापासूनच माझे प्रशिक्षक व वडील या प्रारूपात चांगल्या कामगिरीसाठी आग्रही असायचे. त्यामुळे माझे क्रिकेटमधील आवडते प्रारूप आहे. मी विवियन रिचर्ड्स, सचिन तेंडुलकर, ब्रायन लारा आणि रिकी पॉन्टिंग सारख्या खेळाडूंच्या ध्वनिचित्रफिती पाहिल्या. कसोटी क्रिकेटमधील त्यांच्या खेळाने मला नेहमीच प्रेरणा मिळाली.महिला क्रिकेटमध्येही जेवढे अधिक कसोटी सामने होतील, तेवढेच चांगले असेल. कसोटी क्रिकेटमधील अनुभव खेळाडूंना अधिक परिपक्व बनवतो,'' असे प्रतिका म्हणाली. दिल्ली आणि जिल्हा क्रिकेट संघटनेचे अध्यक्ष रोहन जेटली यांनी प्रतिकाला एका कार्यक्रमादरम्यान ५१ लाख रुपयांच्या पुरस्कारासह सन्मानित केले. तर, विश्वविजेत्या १९ वर्षांखालील पुरुष संघाचा सदस्य उद्धव मोहनला ११ लाख रुपयांचे रोख पारितोषिक देण्यात आले.गेल्या वर्षी दुखापतीमुळे विश्वचषकाबाहेर होण्यापूर्वी प्रतिकाने सात सामन्यांतील सहा डावांत एका शतकासह ३०८ धावा केल्या. भारतासाठी २७ एकदिवसीय सामन्यांत दोन शतक व आठ अर्धशतकांच्या मदतीने ११८९ धावा करणाया प्रतिकाने 'बीसीसीआय' पुरस्कार सोहळ्याचा अनुभव विशेष असल्याचे सांगितले. तसेच, विश्वचषक जेतेपद कारकीर्दीतील सर्वात संस्मरणीय क्षण असल्याचे प्रतिका म्हणाली. ''अजूनही तो क्षण विसरलेली नाही. तो क्षण नेहम ीच संस्मरणीय असेल,'' असे प्रतिकाने सांगितले.

## पाकिस्तानी हल्ल्यात ४०० हून अधिक जणांचा मृत्यू

## अफगाण क्रिकेटपटू संतप्त, राशिद खानचा युद्धगुन्ह्याचा आरोप

काबूल: अफगाणिस्तानची राजधानी काबूलवर पाकिस्तानने केलेल्या हवाई हल्ल्यात किमान ४०० लोक ठार झाले असून, अफगाण क्रिकेटपटूंसह सर्वांनीच या हल्ल्याचा तीव्र निषेध केला आहे.

पाकिस्तानच्या काबुलवरील हल्ल्यानंतर अफगाण खेळाडू संतापले (फोटो–द)

झरज्ञ्ळीींरप अषसहरपळीींरप थरी: पाकिस्तान आणि अफगाणिस्तान यांच्यातील तणाव रौद्र रूप धारण करत आहे. १६ मार्च २०२६ च्या रात्री अफगाणिस्तानमधील काबूलमध्ये झालेल्या एका भीषण हवाई हल्ल्याने संपूर्ण जगाला हादरवून सोडलं. पाकिस्तानने केलेल्या या हल्ल्यात काबूलम धील एका रुग्णालयाला लक्ष्य करून ते पूर्णपणे उद्ध्वस्त करण्यात आलं. मिळालेल्या वृत्तानुसार, या हल्ल्यात ४०० हून अधिक नागरिक ठार झाले आहेत, तर सुमारे २५० जण जखमी झाले आहेत. अफगाण क्रिकेटपटूंनी या हल्ल्याचा तीव्र निषेध केला असून दुःख व्यक्त केलं आहे.

अफगाणिस्तानच्या आरोग्य मंत्रालयाचे प्रवक्ते शराफत जमान यांनी सांगितलं की काबुल या ठिकाणी नशामुक्ती केंद्र असलेल्या एका रुग्णालयावर हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात अनेक निष्पाप लोकांचा मृत्यू झाला आहे.

अफगाणिस्तानचा स्टार फिरकी गोलंदाज रशीद खानने सोशल मीडियावर एका पोस्टद्वारे आपलं दुःख व्यक्त केलं. त्याने लिहिलं, ङ्गकाबूलमधील पाकिस्तानी हवाई हल्ल्यात झालेल्या नागरिकांच्या मृत्यूच्या बातमीने मला खूप दुःख झालं आहे. नागरिकांची घरे, शैक्षणिक संस्था किंवा वैद्यकीय पायाभूत सुविधांना, जाणूनबुजून किंवा अपघा- ताने लक्ष्य करणं हा एक युद्धगुन्हा आहे. मानवी जीवनाप्रती अशी असंवेदनशीलता, विशेषतः रम जानच्या पवित्र महिन्यात, अत्यंत चिंताजनक आहे. यामुळे केवळ द्वेष आणि फूट वाढेल.ङ्घ

रशीद खानने पुढे लिहिलं, ङ्गमी संयुक्त राष्ट्र आणि म ानवाधिकार संघटनांना आवाहन करतो की त्यांनी या घटनेची सखोल चौकशी करून दोषींना जबाबदार धरावे. या कठीण काळात मी माझ्या अफगाण लोकांसोबत उभा आहे. आपण यातून सावरू आणि एक राष्ट्र म्हणून पुन्हा उभे राहू.ङ्घ

अफगाणिस्तान संघाचा दिग्गज खेळाडू मोहम्मद नबीने जखमी आणि मृतांना स्ट्रेचरवरून रुग्णालयात नेले जात असल्याचा एक व्हिडिओ शेअर केला आहे. त्याने लिहिलं, ङ्गआज रात्री काबूलमधील एका रुग्णालयात आशेचा किरण मावळला. व्यसनाधीनतेतून दिलासा शोधणारे तरुण पाकिस्तानी लष्कराच्या बॉम्बहल्ल्यात मारले गेले. दारात उभ्या असलेल्या आई आपल्या मुलांसाठी आक्रोश करत होत्या, पण रमजानच्या २८ व्या रात्री त्यांचे आयुष्य अकाली संपले.दरम्यान, अझमतुल्ला उमरझाईने पोस्ट शेअर करत लिहिलं, ङ्गआज रात्री काबूलमध्ये एका मोठ्या स्फोटाने हादरवून सोडलं.

## बाबर आझम मेंटली अनफिट

कराची–टी२० वर्ल्ड कप २०२६ म धून पाकिस्तान सुपर ८ फेरीतून बाहेर पडला. त्यानंतर त्यांच्या पराभवाचा दुष्काळ काही जायचं नाव घेत नाहीये. नुकत्याच बांगलादेश विरुद्ध झालेल्या वनडे सीरिजमध्ये सुद्धा पाकिस्तानचा तिसऱ्या सामन्यात ११ धावांनी पराभव झाला.

## धोनी हुक्क्याचा शौकीन! भारताचा हा खेळाडू माहीला तयार करून देतो हुक्का



**नवी दिल्ली:** धोनीच्या सीएसकेमधील मित्राने त्याच्या हुक्काप्रति असलेल्या प्रेमाचा खुलासा केला आहे आणि धोनीने एक शीशा मॅन ठेवला असल्याचंही त्याने सांगितलं.आयपीएल २०२४ नंतर, एम.एस. धोनी हुक्का ओढत असल्याचा एक व्हिडिओ व्हायरल झाला होता. तेव्हाप- ासून चाहत्यांना उत्सुकता होती की धोनीला खरंच हुक्का आवडतो का? आता, चेन्नई सुपर किंग्सच्या एका माजी सहकाऱ्याने धोनीच्या सवयीबद्दल एक मोठा खुलासा केला आहे. सीएसकेकडून खेळ- लेला इंग्लंडचा यष्टीरक्षक सॅम बिलिंग्सने धोनीच्या हुक्का पिण्याबद्दल सविस्तरपणे सांगितलं आहे.सॅम बिलिंग्सने 'स्टिक टू क्रिकेट' पॉडकास्टवर धोनीच्या हुक्का पिण्याच्या सवयीबद्दल भाष्य केलं. ज्यामध्ये एलिस्टर कूक, फिल टफनेल आणि मायकल वॉ यांचाही सहभाग होता. त्याने सांगितलं की, टीम हॉटेलमधील धोनीची खोली सर्वांसाठी खुली असते. त्याच्या खोलीचं एक खास वैशिष्ट्य म्हणजे तिथे असलेली छोटी हुक्का व्यवस्था. हुक्का सांभाळण्याची जबाबदारी देखील त्याने संघातील एका खेळाडूला दिली आहे. ज्याला संघाने ४.८० कोटींना ताफ्यात सामील केलं आहे.ङ्गफ्रँचायझी क्रिकेटमध्ये तुम्ही ज्यांच्यासोबत खेळला आहात, त्यांपैकी तुमचा आवडता खेळाडू कोण?ङ्घ असं विचारल्यावर, सॅम बिलिंग्सने एम.एस. धोनीचं नाव घेतलं आणि म्हणाला, अर्थातच धोनी.

## यंदा होणाऱ्या फिफा विश्वचषकात इराण विश्वचषकात खेळेल




आशियाई फुटबॉल कॉन्फेडरेशनचे स्पष्टीकरण

क्वालालम्पूर : जूनमध्ये अमेरिका, कॅनडा आणि मेक्सिको येथे होणार्या विश्वचषकात इराण सहभागी होईल, अशी माहिती आशियाई फुटबॉल कॉन्फेडरेशनचे सरचिटणीस विंडसन जॉन यांनी सोमवारी दिली.

जॉन म्हणाले, इराण विश्वचषकात खेळणार नाही. असे फेडरेशनने काहीही ऐकले नाही. ते आमचे सदस्य आहेत आणि आम्हाला त्यांनी खेळावे असे वाटते. माझ्या माहितीनुसार, इराण खेळत आहे, असे त्यांनी येथे पत्रकार परिषदेत सांगितले आहे. हा एक अतिशय भावनिक क्षण असून, प्रत्येकजण बरेच काही बोलत आहे. शेवटी, इराणी फुटबॉल फेडरेशनने ते खेळत आहेत की, नाही हे ठरवावे. आतापर्यंत, त्यांनी आम्हाला फक्त सांगितले आहे की, ते विश्वचषकात खेळणार आहेत. ट्रम्प यांनी समाज माध्यमावर सांगितले की, इराणशी सुरू असलेल्या युद्धादरम्यान इराणी संघाचे विश्वचषकात स्वागत आहे; परंतु मला वाटते की, त्यांच्या स्वतःच्या जीवितासाठी आणि सुरक्षिततेसाठी त्यांनी विश्वचषकात खेळणे अयोग्य ठरेल.इराणचे विश्वचषकातील तिन्ही गट सामने अमेरिकेत खेळण्याचे नियोजन आहे. इराणचे क्रीडामंत्री अहमद डोनियाअली यांनी गेल्या आठवड्यात सांगितले की, सध्याच्या परिस्थितीत खेळणे अशक्य आहे. इराणी संघाने समाज माध्यमावर त्यांची खेळण्याची इच्छा असल्याचे आहे. करण ही स्पर्धा ट्रम्प किंवा अमेरिकेची नाही तर फिफाची आहे.

# मातंग समाजासाठी ऐतिहासिक निर्णय!



धाराशिव (रामेश्वर डोंगरे)-महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस महसूलमंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे, आमदार राणाजगजितसिंह पाटील, यांच्या अभिनंदनाचा ठराव सर्वसाधारण सभेत मंजूर करण्यात आला. आमदार राणाजगजीतसिंह पाटील यांच्या अथक प्रयत्नामुळे मातंग समाजाची ४० वर्षापासून प्रलंबित साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या पूर्णाकृती पुतळा उभारण्यासंबंधीची मागणी मंजूर झाली आहे. शासकीय दुध डेअरीची एक एकर जमीन साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांचा पूर्णाकृती पुतळा साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे चौक, धाराशिव येथे उभारण्यासंदर्भात लोकनायक आमदार राणाजगजीतसिंह पाटील यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नामुळे महायुती सरकारने शासकीय दुग्ध डेअरीची एक एकर जागा ज्याची शासकीय किंमत २ कोटी ०८ लाख रुपये असून ही रक्कम नगरपरिषद धाराशिव यांनी महाराष्ट्र शासनाला देणे अपेक्षित होते परंतु नगरपरिषद धाराशिव यांची आर्थिक परिस्थिती हालाखीची असल्यामुळे लोकनायक राणाजगजीतसिंह पाटील यांनी ही जागा शासनाकडून मोफत मिळावी यासाठी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस , महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे सातत्यपूर्ण प्रयत्न करून ही जागा साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या पूर्णाकृती पुतळ्यासाठी विनामूल्य स्वरूपात मिळवून घेतली आहे.

या जागेसंबंधीचा निर्णय जिल्हाधिकारी धाराशिव यांनी मागील दोन दिवसांपूर्वीच दिला असून सदर जागा नगरपरिषद धाराशिव यांच्याकडे विनामूल्य, विना मोबदला हस्तांतरित केली आहे.आज दिनांक १६ मार्च २०२६ रोजी तहसील कार्यालय धाराशिव यांच्याकडून माननीय नगराध्यक्ष व मुख्याधिकारी धाराशिव यांच्याकडे या जागेसंबंधीची ताबा पावती देण्यात आलेली आहे .ही जागा लोकनायक आमदारांनी राणादादा यांच्या प्रयत्नामुळे महायुतीचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, महसूलमंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे यांनी राणादादांच्या आग्रहामुळे साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या स्मारकासाठी करण्यासाठी विनामूल्य स्वरुपात नगरपरिषद धाराशिव यांना दिली आहे.

आज नगरपरिषद धाराशिव च्या सर्वसाधारण सभेत लोकनायक आमदार राणा पाटील यांनी मातंग समाजाच्या मागील ४० वर्षापासून च्या मागणीचा हा विषय पूर्ण केल्यामुळे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस,महसूल मंत्री चंद्रशेखरजी, लोकनायक,आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या अभिनंदनाचा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

या जमिनीचा ताबा नगर परिषद धाराशिव यांच्याकडे मिळाल्यानंतर मातंग समाज बांधवांनी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या पूर्णाकृती जागेच्या ठिकाणी जल्लोष करण्यात आला. याप्रसंगी धाराशिव नगरीच्या नगराध्यक्षा माननीय सौ नेहाताई राहुल काकडे, मुख्याधिकारी सौ नीता अंधारे मॅडम,राहुल काकडे, बांधकाम सभापती अभिजित काकडे,पाणी पुरवठा सभापती विलास लोंढे,बापू पवार, वंदना पवार, दत्ता पेठे,बापू पवार,किसन पेठे, खंडू चांदणे, सुमित क्षीरसागर,इतर सर्व सहकारी व मातंग समाज बांधव उपस्थित होते.

# जळकोट येथील केदारलिंग देवालयाची गुढीपाडव्या दिवशी यात्रा




तुळजापूर (विजय पिसे)-तालुक्यातील जळकोट येथील ग्रामदैवत श्री केदालिंगेश्वर देवस्थान ट्रस्टची यात्रा गुढीपाडव्या दिवशी पार पडणार आहे. यात्रेनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे जळकोट गावचे ग्रामदैवत असलेल्या श्रीकेदारलिंगेश्वर देवालयाची यात्रा दरवर्षी गुढीपाडव्याच्या दिवशी पार पडत असते. याही वर्षी यात्रेनिमित्त मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली असून बुधवार ( दि. १८) रोजी सायंकाळी सात वाजता मंदिरात दीपोत्सव साजरा करण्यात येणार आहे. त्यानंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे. गुरुवार (दि.१९) रोजी पहाटे श्रीकेदारलिंगेश्वराला अभिषेक करण्यात येणार आहे व लिंगाची आरास करण्यात येणार आहे.

त्यानंतर गावातून सकाळी आठ वाजता बसवेश्वर चौकातून गाजत वाजत नंदी ध्वज व पालखी मिरवणूक काढण्यात येणार आहे. व त्यानंतर अग्नी प्रवेश कार्यक्रम संपन्न होणार आहे. तरी या यात्रेत सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहन केदालिंगेश्वर मंदिर ट्रस्टनी केले आहे.

# सरस्वती प्राथमिक विद्यालयात स्नेहसंमेलन उत्साहात



धाराशिव (प्रतिनिधी)- शिंगोली येथील सरस्वती प्राथमिक विद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नृत्य, गीत, नाटिका व विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बसवेश्वर थोटे यांनी केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष आबासाहेब रणखांब होते. यावेळी लेखा वित्त अधिकारी ज्ञानेश्वर पौळ, विस्तार अधिकारी दत्ताप्रसाद जंगम, भारत देवगुडे, पंचायत समिती सदस्य शुभ्रता वाघमारे, सरपंच योगिता शिंदे, उपसरपंच मनोज मगर आदी मान्यवर उपस्थित होते.

मुख्याध्यापिका पल्लवी गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले. शिक्षक-शिक्षिका व पालकांच्या सहकार्याने कार्यक्रम यशस्वी झाला. मोठ्या संख्येने पालक व ग्रामस्थ उपस्थित होते.

# सोलार कंपनीचे ६ स्केवर एमएम डीसी केबल वायरची चोरी

नळदुर्ग (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत दि.१५.०३.२०२६ रोजी अणदुर शिवारा येथील सोलार कंपनीचे ६ स्केवर एमएम डीसी केबल वायर ४००० मिटर,सोलार कंपनीचे ६ स्केवर एमएम डीसी केबर वायर जोडण्यासाठी एमसीचोर प्लस व एमसीफोर मायनस टी कनेक्टर, ६००० मिटर वायर, सोलार कंपनीचे ६ स्केवर एमएम डीसी केबर वायर जोडण्यासाठी एमसीचोर प्लस व एमसीफोर मायनस टी कनेक्टर असा एकुण १,०३,७५० किंमतीचा माल अज्ञात व्यक्तीने चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- निरज डुकरे यांनी दि.१६.०३.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन नळदुर्ग पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) गुन्हा नोंदवला आहे.


## महाराष्ट्र शासन

**कार्यकारी अभियंता, कृष्णा मराठवाडा बांधकाम विभाग क्र.१, धाराशिव**

**पत्ता: सिंचन भवन, आनंद नगर, धाराशिव**

E-mail :- eekmed1@gmail.com    दूरध्वनी/ई-मेल क्र. (०२४७२) २२८७४५

## निविदा सूचना क्र. ११ सन २०२५-२६ (द्वितीय मागणी)

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने **कार्यकारी अभियंता, कृष्णा मराठवाडा बांधकाम विभाग क्र.१, धाराशिव,** जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरीता निविदा मागवित आहेत. सविस्तर निविदा सूचना विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार **कार्यकारी अभियंता, कृष्णा मराठवाडा बांधकाम विभाग क्र.१, धाराशिव** यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर कळविण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| १. | **कामाचे नांव :** | उ.सिं.यो. २ अंतर्गत टप्पा १ ते ५ मधील कालव्यावरुन साठवण तलावात पाणी सोडण्यासाठी Feeder Canal च्या कामाचे प्राथमिक सर्वेक्षण व अन्वेषण चे काम करणे. |
| २. | **कामाचा जिल्हा :** | धाराशिव (महाराष्ट्र राज्य) |
| ३. | **निविदेची किंमत :** | रु. ७.७३ लक्ष (वस्तु व सेवाकर वगळता) |
| ४. | **कोरी निविदा उपलब्ध कालावधी :** | दि.१८/०३/२०२६ ते २५/०३/२०२६ |
| ५. | **निविदा सादर करण्याचा कालावधी:** | दि.२७/०३/२०२६ ते २७/०३/२०२६ (सायं ५.०० वाजेपर्यंत) |
| ६. | **निविदा उघडण्याचा दिनांक :** | दि. ३०/०३/२०२६ रोजी शक्य असल्यास किंवा त्यापुढे |
| ७. | **इसारा / बायाना रक्कम :** | रु. ७,८००/- |
| ८. | **काम पूर्ण करण्याचा कालावधी :** | ०६ महिने |
| ९. | **कोरी निविदा संचाची किंमत** | रु. १,१८०/- (वस्तु व सेवा कर सह) |
| १०. | **कंत्राटदाराचा नोंदणी वर्ग :** | महाराष्ट्र शासनाकडे नोंदणीकृत सल्लागार (Consultancy) अथवा सर्वेक्षण (Survey) कंत्राटदार |

* सदर निविदेस महाराष्ट्र शासन जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्रमांकः- निविदा ०४१७/(प्र.क्र.२४७/१७)/मोप्र-१, दि.१८.१०.२०२३ मधील अटी व शर्ती लागु राहतील.
* कार्यकारी अभियंता, कृष्णा मराठवाडा बांधकाम विभाग क्र.१, विभाग, धाराशिव या कार्यालयातुन कोरी निविदा मिळेल.

**जा.क्र. कृमबांविक्र. १/लेखा-२/ निविदा / ६५३**
**कार्यकारी अभियंता, कृष्णा मराठवाडा बांधकाम विभाग क्र. १, धाराशिव यांचे कार्यालय**
**दिनांक - १०.०३.२०२६**

जिमाका/एके/जाहि/१८३

**स्वाक्षरीत/-**
**कार्यकारी अभियंता**
**कृष्णा मराठवाडा बांधकाम विभाग क्र.१, धाराशिव**


# वातावरणातील सततच्या बदलामुळे हळदीच्या उत्पादनामध्ये होतेय घट

उमरगा (प्रतिनिधी)- पारंपरिक पिके घेऊन शेती करणाऱ्या एकुरगा येथील शेतकऱ्यांनी गेले पन्नास वर्षांपूर्वी त्यात बदल करून हळदीचे पीक घेण्याला सुरुवात केली आणि हळदीच्या उत्पादनात अग्रेसर ठरले आहे. यंदा हळदीचे क्षेत्र प्रतिवर्षाप्रमाणे काही प्रमाणात घटले असलेतरी जवळपास ७० हेक्टर क्षेत्रावर हळदीचे पीक आहे. शेती व्यवसायात बदल करून एकुरगा गावाची वेगळी ओळख निर्माण केली आहे.

तालुक्यातील एकुरगा, एकुरगावाडी, शेजारील गावातील शिवारात गेल्या पन्नास वर्षांपासून हळदीचे उत्पादन घेण्याची परंपरा आहे. हळदीचे बेण आणून लावण करण्यापासून काढणीपर्यंत त्यानंतर काढण्यात आलेल्या हळदीवर विशिष्ट प्रक्रिया करून हळदीचे खोंब तयार करण्यासाठी हळद उत्पादक शेतकऱ्यांना मोठी कसरत करावी लागत असते. सुरुवातीच्या काळात या भागात पिकणाऱ्या हळदीला चांगली बाजारपेठ मिळत होती, त्यामुळे क्षेत्र वाढत गेले. मागील पाच-सहा वर्षात हळदीला प्रतिक्विंटल मिळणारा दर कमी झाला. त्यामध्ये वाढलेली मजुरी, निसर्गातील बदलते चक्र आदी कारणाने प्रतिवर्षाप्रमाणे यंदा हळदीचे क्षेत्र कमी झाले आहे. मोठ्या मेहनतीने पिकवलेल्या हळदीला चांगला दर मिळत नसल्याने हळद उत्पादक काही शेतकऱ्यांनी हळदीचे क्षेत्र कमी करून अन्य पिकाचा पर्याय शोधला आहे. एकुरगा व परिसरातील जवळपास २०० एकर क्षेत्रावर हळदीची लावण होते, निसर्गाचा लहरीपणा व रोगाचा प्रादुर्भाव यामुळे उत्पादनात घट होण्यास कारणीभूत ठरल्याने यंदा ६० ते सत्तर हेक्टर क्षेत्रावरती हळदीची लागवड करण्यात आली आहे.

**कुंकवासाठी 'सोरा' उपयुक्त**

हळद पिकांच्या उत्पन्नानंतर शेतावर असलेल्या कुमकुवत स्थितीत असणाऱ्या हळद कोंबाला 'सोरा' म्हणतात. काढणीपूर्ण झाल्यावर शेतकरी सोराची वेचणी करतो. सोरा कुंकू निर्मितीसाठी महत्वाचा आहे. साधारणतः १०-११ हजारावर सोराचा दर आहे. हमीभावाची आवश्यकता : एक एकर क्षेत्रात हळद उत्पादन घेण्यासाठी ८० ते ९० हजार रुपयांपर्यंत खर्च येतो. साधारणतः ३० क्विंटलपर्यंत उत्पादन झाले तर शेतकऱ्यांना फायदा होतो. मात्र पंधरा ते वीस क्विंटलपर्यंत उत्पादन होत असून, त्यामध्ये दरातील होणारी घसरण यामुळे फायदा होत नाही. शासनाने हळदीसाठी किमान दहा हजार हमीभाव आणि बाजारपेठ निर्माण करून दिल्यास शेतकऱ्यांना अधिकचा फायदा होईल अशी हळद उत्पादक गंगाराम जवळगे यांची अपेक्षा आहे.

# सिंधी ताडी अम्ली द्रव बाळगल्याप्रकरणी गुन्हा दाखल

तुळजापूर (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे:आरोपी नामे-परशुराम गणेश गुत्तेदार, वय २७ वर्षे, रा. आंबेजवळगा ता. जि. धाराशिव हे दि.१६.०३.२०२६ रोजी नवीन बसस्थानक समोरील लातुर कडे जाणारे रोडच्या समोरील बाजूस असलेले भोसले खडी क्रेशर पॉईटच्या बाजूला अंदाजे १,००० किंमतीची ५० लिटर सिंधी ताडी अम्ली द्रव अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेले जप्त करण्यात आले. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये धाराशिव शहर पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.


## Name of Change Declaration

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **KAZI ASLAM AHMED**
TO **ASLAMUDDIN IQBALUDDIN KAZI**
Hence for this Declaration i will be known by this name and will use . in future the **ASLAMUDDIN IQBALUDDIN KAZI** will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- **KAZI ASLAM AHMED.**
NEW NAME:- **ASLAMUDDIN IQBALUDDIN KAZI.**
Address :- KAZI PATTA,SHIRIN COLONY, OSMANABAD. DIST. OSMANABAD - 413501
AADHAR NO.- 417212152180
Mob. No.-9665848686

---

## Name of Change Declaration

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **PATHAN SADIYA BEGUM HAFIZ NISAR AHEMAD**
TO **SADIYA ASLAMUDDIN KAZI**
Hence for this Declaration i will be known by this name and will use . in future the **SADIYA ASLAMUDDIN KAZI** will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- **PATHAN SADIYA BEGUM HAFIZ NISAR AHEMAD.**
NEW NAME:- **SADIYA ASLAMUDDIN KAZI.**
Address :- SHIRIN COLONY,GALIB NAGAR, OSMANABAD. DIST. OSMANABAD - 413501
AADHAR NO.- 693599108285
Mob. No.-9665848686

## लातूर समाचार धाराशिव

**बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क**

**9422472502**
**9175325708**


## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649